शनिवार, २ सप्टेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 2 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-35 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5




# एकत्र लढलो तर भाजपला पराभूत करू

## राहुल गांधी : इंडिया आघाडीच्या बैठकीत दोन महत्त्वाचे निर्णय अन् तीन ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीची तिसरी बैठक आज (१ सप्टेंबर) मुंबईत पार पडली. या बैठकीत इंडिया आघाडीने दोन महत्त्वाचे निर्णय घेतले, तसेच तीन ठराव मांडले. आजच्या बैठकीत इंडिया आघाडीने आगामी निवडणुकांसाठीची रणनीति तयार केली आहे. या बैठकीसाठी जमलेल्या २८ पक्षांच्या नेत्यांनी बैठक पार पडल्यानंतर संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे खासदार राहुल गांधी म्हणाले, आम्ही आजच्या बैठकीत दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. तसेच आगामी काळात आमच्या आघाडीचा कार्यक्रम निश्चित केला आहे. आम्ही २८ पक्ष एकत्र आलो आहोत. आगामी लोकसभा निवडणुकीत आम्ही एकत्र लढलो तर नक्कीच भारतीय जनता पार्टीला पराभूत करू शकतो.**

राहुल गांधी म्हणाले, या बैठकीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांचे मी आभार मानतो. आजच्या या बैठकीत दोन महत्त्वाच्या गोष्टी ठरल्या. एक म्हणजे आम्ही इंडियाची समन्वय समिती गठित केली आहे. लोकसभेच्या जागावाटपाबाबत दुसरा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक राज्यातील लोकसभेच्या जागांबाबत राज्य स्तरावर चर्चा करून आम्ही लवकरात लवकर निर्णय घेणार आहोत.

राहुल गांधी म्हणाले, आत्ता या मंचावर जे नेते आणि वेगवेगळ्या पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, हे सर्वजण देशातल्या ६० टक्के लोकांचे प्रतिनिधीत्व करतात. त्यामुळे आम्ही जर एकत्र निवडणूक लढलो तर भाजपा ती निवडणूक जिंकू शकत नाही. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, या सर्व पक्षांमध्ये घट्ट संबंध तयार होऊ लागले आहेत. मला वाटते इंडिया आघाडी भाजपाला आगामी निवडणुकीत हरवू शकते. इंडिया आघाडीने १४ सदस्यांच्या केंद्रीय समन्वय समितीची घोषणा केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील दोन मोठ्या नेत्यांचा समावेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे दोन नेते इंडियाच्या समन्वय समितीचे सदस्य आहेत.

### मोदी सरकार हिंदूद्वेष्टे : उद्धव ठाकरे

स्वत :ला हिंदुत्ववादी मानणाऱ्या या सरकारने गपणतीचे आगमन होत असताना जे विशेष अधिवेशन का बोलावले आहे ? गणपतीला विघ्नहर्ताही म्हणतात . मग हिंदूप्रेमी ऐवजी हे सरकार हिंदू द्वेष्टे आहे का कारण अधिवेशनासाठी गणपतीचा मुहूर्त निवडण्यात आला आहे ,असे म्हणत उद्धव ठाकरेंनी मोदी सरकारवर टीका केली आहे . महाराष्ट्रात गणेश उत्सव सर्वात मोठा असतो . मुंबईतल्या आपल्या माता – भगिनी आणि बांधव हे कोकणात जात असतात . अशावेळी हिंदू सणांच्या वेळी यांनी विशेष अधिवेशनाचा मुहूर्त काढला आहे . हिंदूंच्या सणांमध्ये हे लोक अडथळे आणत आहेत असेही उद्धव ठाकरेंनी म्हणाले .

एक देश एक निवडणूक पण ती निवडणूक पारदर्शक होणार का ? कारण अनेक देशांनी ईव्हीएमला नकार दिला आहे . निवडणूक पारदर्शकपणे व्हायला पाहिजे . त्यासाठी एक देश एक निवडणूक असेल तर लोकसभेबरोबर तुम्ही विद्यापीठाचीही निवडणूक घेणार का ? हे मोदींनी जाहीर केले पाहिजे, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे .पुढची बैठक कधी होईल हे आम्ही जाहीर केलेले नाही . कारण आता लोकांमध्ये जाण्याची वेळ आली आहे . त्यामुळे आता पुढच्या बैठकीऐवजी इंडियाची पहिली जाहीर सभा कधी होईल त्याचा विचार आम्ही करतो आहोत . एकंदरीत वातावरणाचा अंदाज पाहून आम्ही त्याविषयी निर्णय घेऊ .आज राहुल गांधीही म्हणाले की घराणेशाहीवर मोदी कायम बोलतात . मी आज तेच म्हणालो की माझ्यावरही घराणेशाहीवरुन टीका होते . मला माझ्या घराण्याचा अभिमान आहे . काही लोक असे असतील ज्यांना घराण्याचा अभिमान नसेल, तो त्यांचा प्रश्न आहे . जनतेने जर स्वीकारलं असेल तर घराणेशाहीविरोधात लढणारे तुम्ही कोण ? जर तुम्ही घराणेशाहीच्या विरोधात लढत असाल तर मग मित्र परिवाराचे काय ? असाही प्रश्न उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे .

**शरद पवारांचा भाजपावर हल्लाबोल** : राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाजपावर हल्लाबोल केला आहे . भाजपाने विरोधकांवर अहंकारी म्हणून टीका केली . पण, अहंकारी कोण आहे ? हे यातून स्पष्ट होते, असे प्रत्युत्तर शरद पवारांनी भाजपाला दिले आहे . शरद पवार म्हणाले, पुढील रणनिती ठरवण्याचे काम दोन दिवसांच्या बैठकीत करण्यात आले . देशात अनेक गंभीर समस्या आहेत . वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळी परिस्थिती आहे . देशात शेतकरी, कष्टकरी, तरूणांच्या समस्या आहेत . लोकांनी विश्वासने देशाची सत्ता भाजपाच्या हातात दिली . पण, भाजपाविरोधात ठिकठिकाणी नाराजीचे वातावरण दिसत आहे . राजकीय पक्ष एकत्र येत काम करत आहे . त्यांच्या काम आणि नितीबद्दल शंका असू शकते . पण, मुंबईतील इंडियाच्या बैठकीवर भाजपाच्या लोकांनी टीका केली . जमिनीवर पाय ठेवून काम करण्याची अपेक्षा आहे . मात्र, याच्यापासून नेतृत्व करणारे लांब गेले आहेत, असे म्हणत शरद पवारांनी पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले . विरोधकांवर भाजपाचे नेते अहंकारी म्हणून टीका करतात . पण, याने स्पष्ट होते, अहंकारी कोण आहे राजकीय पक्ष एकत्र आलेले काहींना आवडत नाही . त्यांनाच अहंकारी बोलले पाहिजे, असा हल्लाबोल शरद पवारांनी भाजपावर केला आहे . आम्ही थांबणार नाही . चुकीच्या मार्गाने आम्ही जाणार नाही . चुकीच्या मार्गाने जाणाऱ्यांना सरळ मार्गावर आणून . पण, जे येणार नाहीत, त्यांना बाजूला करण्याचे काम आम्ही खांद्याला खांदा लावून करू . देशासमोर एक स्वच्छ आणि चांगले प्रशासन देण्याचं काम आम्ही करणार, असे शरद पवारांनी म्हटले .

### खोटे बोला पण रेटून बोला : मल्लिकार्जुन खरगे

अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मराठीतून टोला लगावला आहे . पंतप्रधान मोदी नेहमी खोटं बोलत असतात . पण, लोक त्याला खरे समजतात . मराठीत एक म्हण आहे, ' खोटे बोला पण रेटून बोला . ' असे पंतप्रधान मोदींचे आहे, असे खरगे यांनी म्हटले आहे . ते ' इंडिया ' आघाडीच्या पत्रकार परिषदेत बोलत होते . मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, "कोणालाही न सांगता संसदेच विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं आहे . मणिपूर जळताना, करोनावेळी, चीन आपल्या जमिनीवर कब्जा करत आहे, तेव्हा विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं नाही . प्रसारमाध्यमे आपल्याजवळ असल्याचं मोदींच्या डोक्यात आहे . छोटे घोटाळे ते करत नाहीत . कॅगच्या अहवालात कोट्यावधींचे समोर आले आहेत . ना खाऊंगा ना खाने दूंगा ' असे मोदी सांगतात . पण, सर्वांना खाण्यास देऊन लोकांना उपाशी मारत आहेत . ते भीती दाखवण्याचा प्रयत्न करतात . मात्र, आम्ही भित्रे नाही आहोत," असे खरगे यांनी सांगितलं . मजबुतीने आम्ही काम करत राहू . याला तोडण्याचं काम मोदींनी कितीही केलं, तरी आम्ही भिणार नाही आहोत . पंतप्रधान मोदी नेहमी खोटं बोलतात . पण, लोक त्याला खरे समजतात . मराठीत एक म्हण आहे, ' खोटे बोला पण रेटून बोला ' असे पंतप्रधान मोदींचे आहे, अशी टोलेबाजी खरगे यांनी केली आहे .

**बैठकीत मांडलेले ठराव** : १ . इंडिया आघाडीतले सर्व पक्ष आगामी लोकसभा निवडणूक आणि शक्य तितक्या विधानसभा निवडणुका एकत्र लढतील . सर्व पक्षांनी तसा संकल्प केला आहे . निवडणुकांसाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये जागावाटपाची प्रक्रिया ताबडतोब सुरू केली जाईल आणि लवकरच पूर्ण केली जाईल . २ . इंडिया आघाडीतले सर्व पक्ष मिळून देशातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये एकत्रितपणे सार्वजनिक सभा घेणार आहेत . ३ . इंडियामधील पक्ष विविध भाषांमधून ' जुडेगा भारत, जीतेगा भारत ' या इंडियाच्या मोहिमेचा प्रचार आणि प्रसार करतील .

**समन्वय समितीमधील १४ सदस्य** : के . सी, वेणुगोपाल ( काँग्रेसचे सरचिटणीस ) शरद पवार ( राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ) एम . के . स्टॅलिन ( तामिळनाडूचे मुख्यमंत्री ) संजय राऊत ( शिवसेना, यूबीटी ) तेजस्वी यादव ( आरजेडी नेते आणि बिहारचे उपमुख्यमंत्री ) अभिषेक बॅनर्जी ( तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस ) राघव चड्ढा ( आपचे खासदार ) जावेद खान ( समाजवादी पक्ष ) लालन सिंग ( जनता दल युनायटेडचे राष्ट्रीय अध्यक्ष ) हेमंत सोरेन ( झारखंडचे मुख्यमंत्री ) डी राजा ( सीपीआय ) ओमर अब्दुल्ला ( नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ) मेहबुबा मुफ्ती ( पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुख ) १४ व्या सदस्यांच्या रुपात मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या एका नेत्याचा समावेश केला जाणार आहे .

# कुणाचा बापही मुंबई वेगळी करु शकणार नाही

## अजित पवार : विरोधकांच्या राजकारणावर खडेबोल

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** नीती आयोगाच्या बैठकीवरुन काहीजण बोलत आहेत. त्यांना विकासाबद्दल बोलायचं नाही. नीती आयोगाने देशातील चार शहरे निवडली आहेत. त्यात मुंबई शहराचा समावेश आहे मात्र मुंबई वेगळी करण्याच्या विषयावर काहीजण राजकारण करत आहेत. मी खोटं कधी बोलत नाही हे अख्ख्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यामुळे जोपर्यंत चंद्र - सुर्य आहेत तोपर्यंत मुंबई वेगळी करण्याचे काम कुणाचा बाप आला तरी करु शकत नाही असा विश्वास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्रातील जनतेला आज दिला. वरळी येथे महायुतीची सभा आज मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेत अजितदादा पवार यांनी विरोधकांना जोरदार खडेबोल सुनावले. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांना पुढे घेऊन आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला काम करत आहोत. त्यामुळे आता झालं - गेलं विसरून नवीन पहाट बघून काम करायचे आहे असा विश्वास अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिला. आपल्या राज्याचा विकास झाला पाहिजे. योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचल्या पाहिजेत. थांबलेली कामे वेगवान पध्दतीने व्हावी यादृष्टीने सरकारने पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे. नैसर्गिक संकटांचा सामना महाराष्ट्राने पाहिला आहे. संकट आल्यावर न डगमगता छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने पुढे जायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करायचे आहेत. मागे काय झालं हे उकरत न बसता चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या जागा निवडून आणावयाच्या आहेत असे आवाहनही अजित पवार यांनी केले.जाणीवपूर्वक आमच्याबद्दल काही बातम्या पसरवल्या जात आहेत. मी, मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस लोकांचे हित लक्षात घेऊन सरकारमध्ये काम करत आहोत असेही अजित पवार यांनी माध्यमात उलटसुलट येणाऱ्या बातम्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली. येत्या वर्षभरात पूर्ण होणाऱ्या प्रकल्पावर सरकारचा जास्त लक्ष घालण्याचा निर्णय झाला आहे.

# 'आदित्य' आज झेपावणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रोने संशोधनासाठी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. चंद्रयान 3 मोहीम सुरु असताना इस्त्रोने सूर्याच्या अभ्यासासाठी मोहीम हाती घेतली आहे. आदित्य एल 1 सूर्याच्या अभ्यास करण्यासाठी श्रीहरिकोटा स्पेस सेंटरवरून 2 सप्टेंबरला झेपावणार आहे. यासाठी लॉन्चिंगची पूर्वतयारी आणि मोहिमेशी निगडीत सर्व यंत्रणांची तपासणी करण्यात आली आहे. आदित्य एल-1 हे पीएसएलव्ही एक्सएल सी57 च्या माध्यमातून अवकाशात झेपावणार आहे. हे स्वदेशी रॉकेट आदित्य एल-1 पृथ्वीच्या लोअर ऑर्बिटमध्ये पोहोचवण्यास मदत करेल. त्यानंतर आदित्य एल-1 पुढचा प्रवास करत थेट पृथ्वीच्या कक्षेबाहेर जाईल. त्यानंतर आदित्य एल-1 सूर्य आणि पृथ्वीच्या दरम्यानंत असलेल्या एल-पॉइंटवर आपले ठाण मांडेल. या संपूर्ण प्रवासाला 4 महिन्यांचा अवधी लागेल. म्हणजेच 2 सप्टेंबर रोजी प्रवासासाठी निघालेले आदित्य एल-1 जानेवारी 2024 पर्यंत निश्चित ठिकाणी पोहोचेल. आदित्य एल-1 मोहीमेसाठीची तयारी पूर्ण झाली आहे. 2 सप्टेंबर 2023 रोजी सकाळी 11.50 मिनिटांनी यान सूर्याच्या दिशेने झेपावणार आहे. आदित्य एल-1 च्या मदतीने सूर्याचा अभ्यास केला जाणार आहे. सूर्यापासून निघणारी किरणांचा अभ्यास केला जाईल.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तर क्रायो म्हणजे अत्यंत कमी तापमान. आपली नेहमीची इंजिने अत्यंत कमी तापमानात कमी करू शकत नाही. मग अशावेळी इंजिन आणि इंधनही त्याप्रकारचे विकसित करावे लागते. त्यात द्रवरूप ऑक्सिजन आणि द्रवरूप हायड्रोजनचा वापर केला जातो. त्यांना क्रमशः उणे १८३ आणि उणे २५३ डिग्री सेंटीग्रेड तापमानावर साठविले जाते. अवकाशातील यानासाठी अशाच प्रकारे काम करणारी क्रायोजेनिक इंजिने उपयोगात आणली जातात. '

'बापरे, केवढे गुंतागुंतीचे तंत्रज्ञान ! राजेश पिंकीला म्हणाला. पण यामुळे भारत त्याबाबतीत स्वावलंबी झाला. त्याला दुसऱ्या देशांवर अवलंबून राहण्याची गरज राहिली नाही. पिंकी म्हणाली. डॉ राव पुढे बोलतच होते. २२ जुलै २०१९ रोजी भारताने चंद्रयान-२ चे प्रक्षेपण केले. पण यात ज्याला आपण सॉफ्ट लँडिंग म्हणतो, तशा पद्धतीने यान चंद्रावर उतरवण्यास आपल्याला अपयश आले. पण या मोहिमेतील चंद्राभोवती फिरणारा ऑर्बिटर आजही कार्यरत असून आपल्या चंद्रयान-३ या मोहिमेसाठी त्याच्या माहितीचा मोठाच उपयोग झाला. भारताची ही चंद्रयान-३मोहीम चंद्रावरील अवघ्या एका दिवसाची पण पृथ्वीवरील १४ दिवसांएवढी असणार आहे. पण भविष्याच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची आहे. चंद्रयान अलगद उतरण्याच्या दृष्टीने तंत्रज्ञान विकसित करणे आणि त्याचे निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी या मोहिमेचा मोठाच हातभार लागलेला आहे. चंद्रयानाचा विक्रम लॅण्डर चंद्रावर सुखरूप उतरल्यामुळे आपली वैज्ञानिक क्षमता सिद्ध झाली आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे आपण चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरलो आहोत. आजपर्यंत तिथे पोहोचणे कोणालाही शक्य झाले नव्हते. जैव-भौगोलिक दृष्ट्या या भागाचे एक वेगळे महत्व आहे. प्रज्ञान बग्गी आणि विक्रम लँडरमुळे चंद्राविषयीची नवनवीन माहिती जगासमोर यायला मदत होणार आहे. त्यामुळेच चंद्रयान-३ चे महत्व केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठीच महत्वाचे आहे. अवकाश मोहिमांबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञानही प्रगत होत असते. या मोहिमेमुळे आपले परग्रहावर उतरण्याची क्षमता विकसित होणार आहे. त्याचा भविष्यातील मोहिमांसाठी नक्कीच फायदा होईल. केवळ अवकाश मोहिमाच नाही तर मानवजातीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्याचा फायदा होऊ शकेल. शिवाय भविष्यातील सूर्य, मंगळ, शुक्र यांचा अभ्यास करण्यासाठी ज्या मोहिमा आखल्या जातील, त्या दृष्टीनेही ही मोहीम महत्वाची आहे.



समृद्ध प्राचीन भारत

## आनंदी पहाट



## धनदौलतीचा थेट संबंध आपल्या भावभावनांशी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पै पै जमवलेली जमापुंजी आपल्या स्वतःसाठी अथवा घरासाठी वापरताना आणि मुख्य म्हणजे ती मिळवताना तसेच जमवताना अनुभवलेल्या प्रत्येक क्षणाची आठवण आपल्याला झाल्याशिवाय राहात नाही. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या पैशाची यथायोग्य बचत करणेही तितकेच जरुरीचे असते. अर्थशास्त्रज्ञ सरकारमधील धोरणे विकसित करण्यासाठी उपयुक्त सिद्धांत आणि तंत्रांचा अभ्यास करतात कारण त्यांना आजच्या जगात कार्यक्षमता कशी निर्माण करायची याचे सखोल ज्ञान आहे. तर, अर्थशास्त्र महत्त्वाचे का आहे ? कारण आणि परिणाम ह्यामधील संबंधांची ही चौकशी आर्थिक वाढीला प्रभावित करण्यासाठी महत्त्वाची आहे. संसाधनांचे वाटप कसे करावे याबद्दल सल्ला देताना अर्थशास्त्रज्ञ, नोकरी, बाजार आणि संपूर्ण समाजावरील जोखीम आणि फायदे पाहतात. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा देखील स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपण पै पै जमवलेले धन अर्थात आपला स्वतःचा पैसा असतो. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली धन-दौलत. ह्या धन-दौलतीचा थेट संबंध आपल्या भाव भावनांशी असतो.



आधुनिक केसरी

**ब्रह्मानंदी साद | चैतन्याची ||**

दांभिकाशी संग | नको करू मना ||
त्यापरी साधना | मौन बरी ||१||
काळ व्यर्थ जाई | वाचाळ बोलाने ||
श्वानाचे भूंकणे | जाण जीवा ||२||
विकार विणतो | व्यसनाचे जाळे ||
घातकी डोहाळे | पातकांचे ||३||
राखावे चारित्र्य | काया वाचा मनी ||
सात्विक चिंतनी | रममाण ||४||
टाळ मृदंगाचा | अनाहत नाद ||
ब्रह्मानंदी साद | चैतन्याची ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

देहो स्वस्थोऽस्तु मे देवि त्वत्कृपया महेश्वरी |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ८० || हे देवी महेश्वरी, तुझ्या कृपेने मला शारीरिक स्वास्थ्य लाभावे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ब्रह्मविद्या संचार बिनु, जिवन मृतक सम जान ।
कर्म धर्म सब भार है, जन्म मरण दुख खान
।।३२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/३२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्येशीवाय जीवन मृतसमान आहे आणि सर्व कर्म, धर्म भारस्वरूप असून जन्म-मरण रूपी दुःखाची खाण आहेत. ब्रह्मविद्येच्या प्रकाशातच जीवनातील सर्व कर्तव्ये पूर्ण होतात. ब्रह्मविद्या हीन सर्व धर्म आणि कर्तव्य अंधकार आहेत. यामुळे जीवन निर्विघ्न आणि सुखमय होऊ शकत नाही. म्हणून ब्रह्मविद्येच्या प्रकाशातच सर्व कार्ये पूर्णपणे सफल होतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येक  जीवात "खरा मी"व दुसरा"खोटा मी "लपलेला असतो. त्यापैकी देहबुद्धी ने पोसलेला "खोटा मी" पूर्णपणे संपल्याशिवाय आत्मबुध्दीचा "खरा मी" आपल्यात पूर्ण ऐश्वर्याने प्रगट होत नाही.यासाठी आत्मानात्म विवेक सदैव जागा ठेवत जगणे हे  मनुष्य जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाचं कर्तव्य आहे. त्यासाठी काय करायला हवे ?तर त्यागमय जीवन, मनाचा निर्धार, समयसूचकता, सर्वांभूती परमेश्वर मानायचा मानाचा मोठेपणा, आदरयुक्त जीवनशैली ह्या गोष्टींचे स्मरण असणे गरजेचे आहे. हे या समासाच्या अभ्यासाने लक्षात येते. शास्त्र प्रचीति गुरूप्रचीति आत्मप्रचीति या तीन्हींचा अभ्यास करत रहाणे,आपल्यात बदल करत रहाणे गरजचे आहे.संत वचनावर विश्वास ठेवणे व आत्मबुध्दी सन्मार्गावर आहे का? या कडे सतत लक्ष देणे गरजेचे आहे. ब्रम्हवस्तूचा स्वतः ला साक्षात्कार झाला म्हणजे "मी आत्मस्वरूप आहे"अशी मनाची ठाम भावना होते आणि "मी जीव आहे"हा जो भ्रम झालेला असतो,तो "मी पणा "संपतो. सदगुरूच्या ज्ञानाचा ऐवढा प्रभाव पडतो की स्वस्वरूपाचा निदिध्यास लागतो जीवन सार्थ होते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामाशिवाय कशानेही समाधान नाही

आधुनिक केसरी

मनुष्य चूक करतो, आणि 'देवा, क्षमा कर' म्हणतो; पण पुन्हा पुन्हा चुका करीतच रहातो. हे काही योग्य नव्हे. अशाने काही त्याला देव क्षमा करणार नाही. 'देवा, क्षमा कर' हे म्हणणे इतके सहज होऊन बसले आहे, की त्याचा अर्थच आपल्या ध्यानात येत नाही. तो जर ध्यानात येत असता तर मनुष्य त्या चुका पुन्हा पुन्हा न करता. अशा रीतीने आपण आपल्या बुद्धीच्या बळावर परमेश्वराला फसवू शकणार नाही. बुद्धीच्या जोरावर जर आपण माणसालाही फसवू शकत नाही तर परमेश्वर कसा फसेल ? आपण आपल्या बुद्धीच्या जोरावर परमेश्वराची प्राप्ती करून घेऊ, असे म्हणणे कदापीही योग्य होणार नाही. तेव्हा शरणागतीशिवाय मार्ग नाही. ते तुम्ही करा.



समाधान काही परिस्थितीवर अवलंबून नाही. कितीही पुराणे वाचली, ग्रंथ मुखोद्गत केले, प्रवचने ऐकली, तरी मनाला समाधान लाभणार नाही. त्याप्रमाणे थोडे तरी आचरण केले पाहिजे. नामात राहिले पाहिजे. नामाशिवाय इतर कोणत्याही गोष्टीने पूर्तता येऊ शकत नाही. नामाशिवाय खरे समाधान मिळणार नाही. तेव्हा तुम्ही भगवंताला अनन्यभावाने शरण जाऊन, त्याचे नाम आवडीने आणि सतत घ्या.

एक गरीब वारकरी पंढरपूरला चालला होता. मोठ्या कष्टाने तो पायी चालला होता. वाटेत एक रेल्वेचे फाटक लागले, ते बंद होते म्हणून तो थांबला. इतक्यात तिथे एक मोटार येऊन उभी राहिली. आत एक मोठा श्रीमंत माणूस बसला होता. तोही पंढरपूरला चालला होता. वारकऱ्याच्या मनात आले, 'देवा, तुझी एवढी निस्सीम भक्ती मी करतो, परंतु माझी ही दशा; आणि हा लबाड व्यापारी, याला मात्र तू ऐश्वर्य देऊन आरामात पंढरपूरची यात्रा घडवतोस. काय तुझा हा न्याय !' एवढ्यात मोटारीचे दार उघडून दोन नोकरांनी त्या माणसाचे हात आपल्या खांद्यावर घेऊन त्याला खाली उतरविले. तो पांगळा होता ! वारकऱ्याने विचार केला, पांगळा होऊन आरामात पंढरपूरला जाण्यापेक्षा गरिबीत पायी जाणे बरे. आपल्याजवळ जे नाही ते ज्याच्यापाशी आहे तो सुखी असला पाहिजे, हे आपण धरून चालतो, पण तसा तो नसतो. त्याचे दुःख आपल्याला माहीत नसते. आणि तो स्वतःला जर सुखी समजत असेल, तर तो दारूच्या मदाप्रमाणे मद समजावा. आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मानणे हाच विषयाची पकड ढिली करायचा उपाय आहे. आपली परिस्थिती ही परमात्म्याच्या इच्छेने आली आहे असे आपण म्हणू या. असे जर आपण केले तर दुःखाचा आवेग कमी होईल.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

सद्गुरू आपला मी पणा घालवतात. सदगरूकडन घेतलेले नाम आणि आपण स्वत:च्या पसंतीने घेतलेले नाम ह्यांत फरक करता येत नाही. तरीसुध्दा सदगुरूकडून घेतलेल्या नामाचे वैशिष्टय आहेच. ते असे की तो त्या नामाच्या पाठीशी सत्तारूपाने असतो आणि आपल्याकडून नामस्मरण होण्यात त्याची आपल्याला फार मदत होते. त्यामुळे आपल्या हातून होत असलेले नामस्मरण त्याच्या सत्तेनेच होत आहे ही जाणीव राहून मी नामस्मरण करतो अशा तऱ्हेचा अहंकार उत्पन्न व्हायला वावच राहात नाही. अशा रीतीने सदगुरूने नाम दिल्यावर एखाद्याला असे वाटेल की मी 'राम राम' असे म्हणत होतोच आणि आता सदगुरूने तेच सांगितले तर मग यात काय मोठे झाले ? पण यातच विशेष आहे कारण यात मी कर्ता हा अभिमान टाकावा लागतो. सदगुरूकडून नाम घेतले म्हणजे आपल्या कर्तेपणाच्या अभिमानाला वाव रहात नाही.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अनिलोडितकार्यस्य वाग्जालं वाग्मिनो वृथा ।
निमित्तादपराद्वेपोर्धानुष्कस्यैव वल्गितम् ॥

सरलार्थ - ज्याचा बाण लक्ष्यवेध करू शकला नाही, अशा धनुर्धा-याच्या वल्गना जशा व्यर्थ असतात, तद्वत ज्याला आपले काम नीट करता येत नाही, अशा माणसाच्या वल्गनाही व्यर्थ असतात.

स्पष्टीकरण - आपले काम चोख बजावावे आणि मग त्याबद्दल बढाया माराव्या. पण पुष्कळ माणसे काम नीट न करताच 'मी असे केले, मी असे करीन' अशा वल्गना करीत असतात. अशा माणसांचा पोकळपणा लक्षात यायला वेळ लागत नाही.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# खरीप गेल्यात जमा, रब्बीची हमी नाही..!

## दयावान ग्रुपचे अमोल नरवाडे : शेतकऱ्यांवर दुष्काळाचे सावट

आधुनिक केसरी

सध्या हिंदू या मुस्लिम खतरे में नहीं, सोयाबीन, तुर, मूग, उडीद और शेतकरी खतरे में हैं..!! यासह, अशा अनेक पोस्ट सोशल मीडियावर झळकत आहेत.यातून सद्यस्थितीत उद्‌भवलेले दुष्काळाचे सावट अधोरेखित करत आहेत. निसर्गाचा लहरीपणा काय असतो, याचा प्रत्यय यावर्षीच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांना आला आहे. संपूर्ण जून महिना कोरडा गेल्याने खरीप पेरण्या होतील की नाही अशी साशंकता निर्माण झाली होती. अखेर जुलैमध्ये वरूनराजाचे आगमन झाले. आणि उशिरा का होईना, पण शेतकऱ्यांनी चाड्यावर मुठ ठेवली. मात्र पेरणीचे काम पूर्ण होताच, पावसाने अशी काय सुरुवात केली की, त्यामुळे जमिनीत गाडलेले बियाणे उगवणार का नाही..? अशी चिंताजनक स्थिती शेतकऱ्यांची झाली होती. तथापि दयावान निसर्गाने थोडीफार साथ दिली. आणि उगवलेले पीक बहरून आले. पण, ऐन फुलं व शेंगा धरण्याच्या अवस्थेत पुन्हा निसर्गाचा लहरीपणा अवखळला. पावसाने प्रदीर्घ दडी धरली. परिणामी वाशिम जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातील शेतकऱ्यावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले. याबाबत सबंधित शासन, प्रशासन व सरकारने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिला पाहिजे. कारण आता पाऊस आला तरी खरीप गेल्यातच जमा आहे.. आणि रब्बीची हमी देता येत नाही..! असे मत युवक काँग्रेसचे माजी रिसोड मालेगाव विधानसभाअध्यक्ष तथा दयावान ग्रुपचे संस्थापक अमोलभाऊ नरवाडे यांनी आधुनिक केसरी सोबत बोलताना व्यक्त केले आहे. प्रस्तुत प्रतिनिधीशी बातचीत करतांना, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचा

आधुनिक केसरी वॉच..




वसंत खडसे
9373578429


उहापोह अमोल नरवाडे यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले, आपला देश कृषी प्रधान असूनही शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्यास व त्या पोटतिडकेने सोडविण्यासाठी मात्र कोणत्याही राजकारण्याकडे वेळ नाही. हीच सर्वात मोठी शेतकऱ्यांसाठी दुर्दैवी बाब आहे. खरेतर, सरकार मायबाप असते त्यांना जगाचा पोशिंदा असलेल्या भूमिपुत्रांची व्यथा कळायला हवी. मुलाच्या पोटात दुखत असेल तर आईला वेगळे सांगण्याची गरज नसते..! अशीच काहीशी अवस्था आज रोजी शेतकऱ्यांची झाली आहे. पावसाअभावी खरीपाची जवळपास सर्वच पिके हातची गेली आहेत. हीच परिस्थिती काही दिवस कायम राहिल्यास जमिनीतील जलस्त्रोतांची पातळी देखील खालवणार आहे. हे सुद्धा वेगळे सांगण्याची गरज नाही ! परिणामी भाजीपाल्यासारखी इतर ओलितांची पिके घेऊन उदरनिर्वाहाचे गुजरान करणाऱ्या शेतकऱ्यांवर सुद्धा उपासमारीची वेळ येणार आहे. ही स्थिती लक्षात घेता निदर्शने, आंदोलन, निवेदने आदी बाबींची वाट न पाहता सरकारला शेतकऱ्यांची मने वाचता आली पाहिजेत. आज पावसाअभावी विदर्भ व मराठवाडा हळहळतो आहे. उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या अनेक समस्या देखील कायमच आहेत. अशा भरडलेल्या अवस्थेत सरकारने नुकसान भरपाईची मदत मिळविण्यासाठी दहा-बारा पानांचा अर्ज भरण्याची शेतकऱ्यांवर वेळ आणू नये..! त्यासाठी सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून, सर्व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला पाहिजे. विजबिल माफ करून सरसकट पिक विमा मंजूर करायला पाहिजे. दुष्काळग्रस्त म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक व नोकरी अर्जासाठी भरावी लागणारी फी विनामूल्य केली पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अल्पभूधारक शेतकरी व आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या मुलांना शासनाकडून देण्यात येणारी डॉक्टर पंजाबराव देशमुख स्कॉलरशिपची अनेक वर्षापासून थकीत असलेली रक्कम त्वरित संबंधित लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. ही सर्व मदत अगदी वास्तववादी आहे, कारण हिरवीगार दिसत असलेली पिक डोळ्यासमोर करपत आहेत. शेतकऱ्यांच्या तोंडातला घास निसर्ग हिरावून घेत आहे. पुढे बोलताना, अमोलभाऊ नरवाडे यांनी हाही मुद्दा उपस्थित केला आहे की, गेल्या अनेक वर्षापासून नवनवीन तंत्रज्ञानातून शेती प्रगत होत असली तरी त्या मानाने उत्पादन खर्च सुद्धा वाढला आहे. परंतु शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही ही सर्वात मोठी समस्या आहे. त्यातच निसर्गाचा लहरीपणा घातक ठरत असल्याने शेती न परवडणारी ठरत आहे. सदर परिस्थिती शासन आणि प्रशासनास चांगल्या प्रकारे माहिती आहे. त्यामुळे कोणती समिती नेमून पंचनामे मग अहवाल अशा फालतू भानगडीत सरकारने वेळ न घालवता, दुष्काळ जाहीर करून सर्व शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत करावी. अन्यथा.. शेतकऱ्यांच्या पोरांना आता फक्त "औता " वरच नव्हे; तर व्यवस्थेच्या "छाताडा "वर बसून मदत घ्यावी लागेल..! असा इशारा देखील दयावान ग्रुपचे अमोलभाऊ नरवाडे यांनी आधुनिक केसरीच्या माध्यमातून संबंधित व्यवस्थेला दिला आहे.



# चंद्रपुरात महिलांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडल करिअर सेंटर व सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार पटेल महाविद्यालयात महिलांसाठी पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या रोजगार मेळाव्यात जय महाराष्ट्र प्लेसमेंट सर्व्हिसेस चंद्रपूर, व्हि-1 क्लिक सोलुशन, स्वातंत्र्य फायनान्स बल्लारपूर, एस.बी.आय. लाइफ इन्शुरन्स, एल.आय.सी. वरोरा, एलिव्हेट फायनान्स लिमि., व्हि.व्हि.आर. फायनान्स आदी कंपन्या सहभागी होत्या. या रोजगार मेळाव्यात 379 महिला उमेदवारांची उपस्थिती होती, त्यापैकी 95 महिला उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. याप्रसंगी पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, सुधा पोटदुखे, सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरमे, ॲड. प्रिया पाटील आदींची उपस्थिती होती. पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी म्हणाले, कौशल्याचा वापर रोजगार व स्वयंरोजगार मिळवण्यासाठी करावा, उमेदवारांनी नवउद्योजक बनावे तसेच या ठिकाणी आलेल्या उद्योजकांनी जास्तीत-जास्त उमेदवारांना रोजगाराची संधी द्यावी. यासोबतच महिला उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. ॲड. प्रिया पाटील म्हणाल्या, स्त्रियांनी चुल व मूल या संकल्पनेत गुंतून न राहता उच्च शिक्षण घेऊन स्वावलंबी बनावे, रोजगार मेळाव्यातून संधीचा लाभ घ्यावा व महिला उद्योजक म्हणून नावारुपास यावे. रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त भैय्याजी येरमे म्हणाले, या रोजगार मेळाव्यात विविध कंपन्या सहभागी झाल्या आहेत. या माध्यमातून उमेदवारांना रोजगाराची संधी चालून आली आहे. या संधीचा लाभ घ्यावा तसेच उमेदवारांनी आपल्या कौशल्याचा वापर रोजगार मिळवण्यासाठी करावा व नोकरीसाठी बाहेर जाण्याची मानसिकता ठेवावी असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापिका कविता रायपूरकर तर आभार मुकेश मुजंनकर यांनी मानले.



**'मेरी माटी, मेरा देश' अभियाना निमित्त भाजपा प्रदेश कार्यालयात शुक्रवारी कार्यक्रम झाला. या अभियानांतर्गत अमृत कलशांमध्ये माती, धान्य गोळा करून हे कलश ३१ ऑक्टोबरला दिल्लीला अमृतवाटिकेच्या निर्माणासाठी नेण्यात येणार आहेत. भाजपा प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, ज्येष्ठ नेते सुनील कर्जतकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, माधवी नाईक, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ, भरत पाटील आदी यावेळी उपस्थित होते.**

# पैठण तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करा; अखिल भारतीय छावाची मागणी

आधुनिक केसरी

**पैठण :** गेल्या तीन महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने तालुक्यातील शेतकरी मेटाकुटीस आला आहे. धरणाचा पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जनावरांचा व चारांच्या प्रश्नासह रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाल्याने पैठण तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने तहसीलदार सारंग चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी खरीप पिकांवर केलेला खर्च पूर्णतः वाया गेला असून कापूस, मका, सोयाबीन, मूग, उडीद पिके पाण्याअभावी पिवळी पडली आहे. शासनाने एका रूपायात पीकविमा योजना सुरू केल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे. यामुळे विमा कंपनीला आदेशीत करून पीकविमा द्यावा अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. अशीच परिस्थिती तालुक्यात राहिली तर पाणी व चाऱ्याची भीषण टंचाई निर्माण होणार आहे. तसेच पैठण तालुक्यातील बहुतांश गावात पिण्यासाठी पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहे. करिता शासनाने पैठण तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करून हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा नसता अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांना घेऊन आपल्या कार्यालया समोर तीव्र निदर्शन करण्याचा इशारा निवेदनात दिला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष किशोर शिरवत, जिल्हा सरचिटणीस सोमनाथ शिंदे, तालुका अध्यक्ष किशोर सदावर्ते, शहराध्यक्ष साईनाथ कर्डीले, शहर उपाध्यक्ष नंदकिशोर बाबर, ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब गिरगे, गणेश म्हस्के, शाम काळे, पैठण गोकुळ पठाडे विजय वरघट आदी उपस्थित होते.

# मुरंबी येथे सोयाबीन पिकांची कार्यशाळा; शेतीशाळेत पिकावरील रोग व फवारणीचे केले मार्गदर्शन

आधुनिक केसरी

**लोहा :** तालुक्यातील मुरंबी येथे शेतकरी बांधवांच्या थेट बांधावर लोहा येथील कृषी विभागाने कृषी अधिकारी पोटपेलवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोयाबीन कापूस , यावर होणारी किड व रोग विषयी कृषी विभागाने फवारणी किट देऊन महीती दिली व औषधांच्या किटचे वाटप केले. सध्या महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी असल्याने कृषी विभाग शेतकऱ्यांच्या मदतीला सरसावला असुन कृषी विभागामार्फत थेट बांधावर जाऊन राज्य पुरस्कृत उत्पादन वाढ मुल्य साखली योजने अंतर्गत सोयाबीन या पिकाविषयी शेतीशाळा घेण्यात आली.

तालुका कृषी विभागाच्या शेती शाळेला कृषी सहाय्यक चंद्रशेखर नागठाणे, सरपंच रामेश्वर पवार, पोलीस पाटील प्रकाश लक्ष्मण आचणे, उपसरपंच संदीप पवार, ग्रा.पं.स सुरेश आचणे, कमलाकर आचणे, चेअरमन विठ्ठल गणेश पवार, आर्मी प्रदीप आचणे, माधव पवार किरण पवार मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.



# लालूंची टोलेबाजी

आधुनिक केसरी

इंडियाची तिसरी बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत लालूप्रसाद यादव यांनी मोदींना आम्ही हटवणारच असा नारा दिला आहे. काहीही झाले तरीही आम्ही जिंकणारच, जागा वाटपावरुन आम्ही वाद घालणार नाही. इंडिया जिंकणार आणि मोदी हरणार असे लालूप्रसाद यादव यांनी म्हटले आहे. तसेच इस्रोच्या शास्त्रज्ञांनी आता मोदींना सूर्यावर पाठवावे असा टोलाही लालूप्रसाद यादव यांनी लगावला. विविध पक्षाचे नेते वेगवेगळे होते, त्यामुळे नरेंद्र मोदी हे पुढे गेले. आमच्या एकजूट नव्हती. पण आज मला आनंद होतो आहे की आम्ही या देशाच्या विविध पक्षाचे नेते आता एकत्र आलो आहोत. आम्ही एकत्र नसल्याची किंमत देशाला मोजावी लागली. त्याचा फायदा नरेंद्र मोदी यांनी घेतला असे लालूप्रसाद यादव यांनी म्हटले आहे. या देशात अल्पसंख्याक वर्ग सुरक्षित नाही. काय काय चालले आहे तुम्हाला ते माहित आहेच असेही लालूप्रसाद यादव यांनी म्हटले आहे. देशात गरीबी वाढते आहे, महागाई वाढते आहे. भेंडी ६० रुपये किलो झाली आहे. टोमॅटोचे दर गगनाला भिडले आहेत. आता आम्ही सगळे एकत्र येऊन मोदींना लढा देत आहोत. आमची ही तिसरी बैठक आहे. या बैठकीतून एका निष्कर्षावर आम्ही पोहचलो आहोत. तुम्हाला माहित आहेच की खोटे बोलून, अफवा पसरवून सत्ताधारी सत्तेत आले. आमच्या विरोधात असा अपप्रचार केला गेला की आमचा पैसा स्वीस बँकेत आहे. त्यावेळी मोदींनी ही घोषणा केली होती की प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये जमा होणार असे सांगितले होते. आम्हीही आमचे खाते उघडले होते. आम्ही ११ जण आहोत एका कुटुंबात त्यामुळे आम्हाला वाटले खूप पैसे मिळतील. मात्र तो जुमलाच होता. सगळ्या देशातल्या लोकांची बँक खाती उघडण्यात आली. काय मिळाले तुम्हाला? माहित आहेच ना. एक पैसाही मिळाला नाही. सध्या चांद्रयान आपण चंद्रावर पाठवले आहे. त्यामुळे इस्रोचे कौतुक होते आहे. आता आम्ही ऐकले आहे की मोदीजी हा विचार करत आहेत की देशाची प्रगती झाली पाहिजे. आता माझे इस्रोच्या शास्त्रज्ञांना हे आवाहन आहे की त्यांनी नरेंद्र मोदींना सूर्यावर पाठवावे. सूर्यावर एकदा मोदी पोहचले की जगभरात त्यांचे नाव होईल असा टोलाही लालूप्रसाद यादव यांनी लगावला. राहुल गांधी अमेरिका आणि इतर देशांमध्ये फिरत असतात. त्यांनाही कळेल की मोदीजी सूर्यावर गेले आहेत. तिथे जाऊन देशाचे नाव ते उंचावत आहेत. दसरा झाला की याची तयारी इस्रोने सुरु करावी. आमची शुभेच्छा आहे की मोदींनी आता सूर्यावर जावे. एकीकडे इतकी गरीबी आहे, महागाई आहे आणि सांगितले जाते आहे देश विकास करतो आहे. विरोधकांच्या मागे ईडी, सीबीआय लावायची. आम्ही पूर्वी हे ऐकायचो की गरीबांना खोट्या केसेस मधे अडकवून छळायचे. आम्हालाही असेच छळले गेले मात्र आम्ही घाबरणार नाही, आम्ही लढणार आहोत असेही लालूप्रसाद यादव म्हणाले.

# आदित्य L-1 : चंद्राकडून सूर्याकडे नवी गरुड झेप

आधुनिक केसरी



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

**आदित्य हे नाव सूर्याच्या 12 नावांपैकी एक आहे. भारतीय संस्कृतिमध्ये सूर्याला आदराचे स्थान असून त्यास देवता समान पुजले जाते. ओडिसा मधील कोणार्क सूर्य मंदिर त्याचे उत्त्म उदाहरण होय. सूर्य 12 घोड्यांच्या रथावर बसून भूतलावर रोज अवतिर्न होतो, अशी दंत कथा आहे. परंतु विज्ञान युगामध्ये अंतराळाच्या गृहमालेतील मध्यवर्ती बिंदू म्हणून सूर्याचे स्थान अनन्य साधारण आहे. त्यामुळे अमेरिका, रशिया, चीन, जपान पाठोपाठ आता भारत ही संशोधनासाठी सूर्याच्या परिक्षेत्रात आदित्य l-1 हे अंतराळ यान पाठवित आहे. ज्ञान विज्ञान क्षेत्रातील क्रांतीकारक प्रगतीमुळे भारत जगातील चौथी अंतराळ शक्ती बनलेला आहे, या शक्तीचे सामर्थ्य चंद्रयान 3 मुळे शिद्ध झाले.**

आता आदित्य L-1 हे नवे अंतराळ यान सौर ऊर्जा संशोधन क्षेत्रात नवे दमदार पाऊल टाकत आहे. इझरो म्हणजे भारतीय अंतराळ संशोधन संस्था एकाहून एक नवे विक्रम प्रस्थापित करत आहे. आदित्य L-1 ही भारताची एक सुनियोजित अंतराळ संशोधन मोहिम होय. उच्च तंत्रज्ञानाने प्रगत व अद्यावत असलेले हे यान अंतराळ संशोधन क्षेत्रात नवा मैलाचा दगड ठरत आहे. त्याची रचना व विकास करताना इस्त्रोने भारतातील विविध अंतराळ संशोधन संस्थाशी उत्तम प्रकारे समन्वय साधला आहे. पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील 1.5 दशलक्ष किलोमीटर एवढे अंतर असून ते आदित्य अंतराळ यान 4 महिण्यात कापणार आहे. सौर वातावरणात आणि चुबंकीय क्षेत्रातील वादळे आणि प्रथ्वी भौवतिच्या पर्यावरणावर होणारा त्यांचा परिणाम यांचा अभ्यास या यानामुळे शक्य होणार आहे. केवळ भारताच्याच नव्हे तर संबंध मानव जातीच्या कल्याणाच्या दृष्टीने काही मौलीक तथ्य या शोध मोहिमेमुळे समोर येणार आहेत. सूर्या भौवतीच्या परिसराचे निरीक्षण व परीक्षण केले जाणारे हे पहिले संशोधन महापर्व आहे. PSLV उपग्रहाच्या आधारे या अंतराळ यानाचे प्रक्षेपण केले जाईल. खरे तर हे नवे यान म्हणजे एक पद्धतशीर व सुनियोजित संशोधन करणारी सुविकसित वेदशाळा किंवा प्रयोगशाळा होय. या अदित्य L-1 अंतराळ यानाची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे नोंदविता येतील. सूर्यावरच्या वातावरणातील क्रोमोफिअर आणि कोरोना (बाह्य अवरण) या अवरणांचा शास्त्रीय अभ्यास करणे. दोन्ही अवरणातील उष्णता मानाचा अभ्यास करणे व आयनिकृत प्लाझमाचे भौतिकशास्त्र दृष्टीने अध्ययन करणे. सूर्यापासून निर्माण होणाऱ्या कणांचा गतीशिलतेचा अभ्यास करण्यासाठी डेटा प्रदान करणारे टीन सीटू कन आणि प्लाझमा वातावरणातील घटकांचे निरीक्षण करणे. सौर कोरोनाचा भौतिकशास्त्र दृष्टीने अभ्यास करून त्यातील उष्ण यंत्रणेचे अकलन करणे, तसेच कोरोनल लुक प्लाझाचे अध्ययन करून त्याचा वेग आणि घनता तपासणे. CMES चा विकास कसा होतो, त्याची गतिशीलता कशी बदलते याचा अभ्यास करणे, तसेच अनेक स्तरावर होणाऱ्या आधार व विस्तारांचा अभ्यास करणे व सौर उद्रेक घटकांचे विश्लेषण करणे. सौर कोरोनामध्ये होणाऱ्या चुबंकीय बदलांचे आणि क्षेत्रांचे मूल्यमापन करणे. अंतराळ हवामान शास्त्रासाठी सौर चालक व सौर वाऱ्यांची उत्पत्ती व गतिशीलता याचा अभ्यास करणे. सौर ऊर्जा शक्तीचा मानवी कल्याणासाठी नियोजित विकास करणे.
आदित्य L-1 ची ऐतिहासिक पार्श्वभूमी वैशिष्ट्ये पूर्ण आहे, जानेवारी 2008 मध्ये अंतराळ संशोधन समितीने ही संशोधन संकल्पना प्रथम मांडली. प्रथम असे ठरले होते की, सौर कोरोनाचा अभ्यास करण्यासाठी एक लहानसे 400 कि. ग्र. वजनाचा उपगृह तयार करावा. 2016-17 या आर्थिक वर्षात या प्रकल्पासाठी 3 कोटी रूपयांचे बजेट तयार करण्यात आले होते. त्यानंतर विचार करून या मोहिमेची व्याप्ती वाढवण्यात आली. आता लॅग्रेज पॉइंट येथे पोहचण्यासाठी सर्व समावेशक अंतराळ, पर्यावरण, वेद शाळा प्रस्थापित करून त्या आधारे पर्यावरण वेद शाळा तयार करण्याचा संकल्प केला आहे. अर्थात त्यामुळे मोहिमेचे नाव बदलून आदित्य L-1 असे ठेवण्यात आले आहे. या मोहिमेचा खर्च 378.53 कोटी येवढा अपेक्षित



आहे, तो अमेरिका, रशिया, चीन जपान या राष्ट्रांनी केलेल्या खर्चाच्या तुलनेत खूपच कमी आहे.
या शास्त्रीय मोहिमेच्या विकासाचा वेधक आढावा घेतला असता असे दिसते की, सूर्य आणि पृथ्वी यांच्या प्रणालीतल लॅग्रेज बिंदू पर्यंत पोहचून त्याचा अभ्यास अदित्य L-1 मोहिमेद्वारे केला जाणार आहे. लॅग्रेज हे नाव एका फ्रेंच शास्त्रज्ञाच्या नावाने देण्यात आलेले आहे. 18 व्या शतकात त्याने सूर्या भौतिच्या 5 घटकांचा शोध लावला. म्हणजे त्याने शोधलेल्या 5 घटकांपैकी लॅग्रेज हा शेवटचा बाह्य घटक होय. लॅग्रेज हा पाच बिंदू पैकी एक असून तेथे पोहचल्यानंतर हे यान बारकायीने नोंदी करून चापेक्ष ज्ञान संपादन करेल. पृथ्वीच्या 109 दिवसानंतर हे अंतराळ यान सूर्याजवळच्या पहिल्या स्तरापर्यंत पोचेल. तेथे त्याचे संशोधन कार्य सुरू होईल व 5 वर्ष डेटा पाटविण्याचे काम त्याद्वारे शक्य होईल. सौर गतिशीलतेचा अभ्यास करताना, तसेच भौतिकशास्त्राचा अभ्यास करताना महत्वाच्या कुट प्रश्नांची अकलन करणे त्यामुळे शक्य होईल. सूर्याच्या खालच्या व वरच्या वातारवणातील तापमाणात होणारे बदल तसेच सुर्याच्या किरणेत्सर्गाच्या पृथ्वीच्या वातारणात कमी व दिर्घ काळात कसा परिणाम होतो हे आतापर्यंत समजलेले नाही. सुर्याच्या वातावणाविषयी विविध स्तरावर एकाच वेळी होणाऱ्या परिणामाबाबत शोध घेणे त्यामुळे शक्य होईल. तसेच या प्रकाल्पामुळे एका स्तरातुन दुसऱ्या स्तरात होणारे बदल अभ्यासता येतील. तसेच आदित्य L-1 मिशनमुळे सूर्याच्या गतीमान प्रक्रियेचे सर्व समावेशक ज्ञान विकसित होऊ शकेल. त्यामळे सौर भौतिकशास्त्रात काही जटिल प्रश्नांचे नव्याने अकलन होऊन ज्ञानात उल्लेखनीय भर पडू शकेल. सूर्याभौतिच्या एका बाह्य वलयाला कोरोना असे म्हटले जाते, हा कोरोना ग्राफ एखाद्या जादुगाराप्रमाणे सूर्य प्रकाश रोखून कृत्रिम सूर्य गृहण तयार करतो या दुरबिणीमध्ये दृषमान इन्फ्रारेड तरंग लांबीमध्ये कोरोनाचे स्पेक्ट्रल इमेजिंग करण्याची क्षमता असते. सौर कोरोनाचे निदान मापदंड आणि गतिशास्त्र याचा अभ्यास या यानामुळे शक्य होणार आहे. सौर कोरोनाच्या चुबंकीय क्षेत्राचे मापन करून विविध तथ्य समोर येतील व त्यांचा उपयोग करून पृथ्वीच्या हवामानातील बदलांचे अध्ययन करता येईल. विशेषतः अलिकडे जागतिक हवामान बदलानंतर वाढत्या तापमाणाची नवी समस्या जगभर उद्‌भवली आहे. या समस्येचे शास्त्रीय निदान करून नवे अकलन करणे शक्य होईल. त्यामुळे अचानक येणारी वादळे, सुनामी लाटा इत्यादीचा अभ्यास करता येईल.
या अंतराळ यानासाठी वापरलेल्या पेलोड उपकरणांचे वजन 170 कि.ग्रॅ. आहे. 5 वर्षाच्या कालावधी पर्यंत हे अंतराळ यान सुर्याच्या L-1 परिसरात राहून विविध प्रकारची माहिती भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला पाठविणार आहे. ही माहिती सौर कणामुळे उष्णता मानात होणारे बदल तसेच पृथ्वीच्या वातावरणावर पडणारे त्याचे पडसाद यामुळे त्यांचे अकलन करून मौलिक संशोधन शक्य होणार आहे. या यानातमध्ये एकूण सात पेलोडस् ऑन बोर्ड आहेत, त्यापैकी चार सूर्याचे रिमोट पेन्सिन करतात आणि त्यापैकी इतर तीन इन सी टू निरीक्षणे नोंदवितात आणि त्याच्या प्रमुख क्षमतासह या पेलोडस् कार्य वैशिष्ट्ये पूर्ण असून त्यांच्यावर विशेष माहिती संकलित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कार्य विभागणी, दृष्यमाने व विशेषिकरण या तत्वावर त्यांची विभागणी करण्यात आली आहे. दृष्यमान उत्सर्जन रेषा, कोरोना ग्राफ, सौर आस्ट्रो हॅयोलेट इमेजिंग टेलिस्कोप, सौलार लो एनर्जी एक्सरे स्पेक्ट्रोमिटर, उच्च उर्जा परिभ्रमण क्षकिरण स्पेक्सट्रो मिटर, आदित्य सौर कण प्रयोग, आदित्य प्लाझमा विश्लेषण पॅकेज, प्रगती त्रिपक्षीय उच्च रेझोल्युशन डिजिटल मॅनोटो मिटर या सात उपकरण यंत्राणांचा समावेश आहे. आदित्य L-1 मिशन बुकलेट मध्ये इझरो ने त्याचे विस्तृत विश्लेषण दिले आहे. प्रत्येक टप्प्यावर मूल्यमापणाची स्वतंत्रा प्रणाली विकसित करण्यात आली आहे. अशा प्रकारे या मोहिमेची रचना व मांडणी अंत्यत शास्त्रीय पणे करण्यात आली आहे. कमीत कमी खर्च आणि उत्तम नियोजन हे या योजनेच्या यशाचे खरे रहस्य होय. योग्य व्यक्तिकडे योग्य काम ह्या तत्वाच्या आधारे आदित्य ची काखणी करण्यात आली आहे. इझरो ने या संशोधनात पुण्यातील आयुका या संस्थेचे साह्य घेतले आहे. या संस्थेतील संशोधन तसेच विविध उपकरणांची निर्मिती करतांना स्वदेशी व आत्मनिर्भर भारत या कल्पना कृति मध्ये आणल्या आहेत. तिचे यश इझरोच्या सामुदायिक सांघिक कामावर अवलंबून आहे. आदित्य L-1 या अंतराळ यानामुळे सौर ऊर्जा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणार आहे. ही योजना केवळ भारताच्या नव्हे तर संबंध मानव जातीच्या कल्याणासाठी नवे वरदान ठरू शकेल.

# चीनचा खोडसाळपणा

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

**भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला.**

अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. आता पुन्हा त्याने भारताची अशीच खोडी काढून खोडसाळपणा केला आहे. यावेळी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले आहे. जी २० शिखर संमेलनात चीनने त्यांचा नवीन नकाशा जाहीर केला. हा नवीन नकाशा नुकताच इंटरनेटवर प्रसिद्ध झाला या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली आहेत. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला आहे. अर्थात केवळ चीनचा निषेध करून चीन आपल्या या खोड्या बंद करणार नाही कारण दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. काही महिन्यांपूर्वी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी झालेल्या धुमश्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन




जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२३ चा भारत आहे. चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने स्वीकारले आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा

## शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्यचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तहसीलदार यांना विनंती करण्यात येते की वरील विषयी मागणी आपण शासनास सादर करावे ही आग्रहाची विनंती कारण सगळेच पक्ष आपापल्या पार्टीच्या कामाला लागले आहे शेतकऱ्याकडे कोणत्याही पक्षाचे लक्ष नाही परंतु यावर्षी पाऊस नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे शेतकऱ्यांच्या तोंडाचे पाणी पळाले आहे कारण शेतकऱ्याने होता नव्हता तो पैसा शेतीत लावून टाकला आहे व पावसाची वाट पहात बसलेला आहे परंतु आता जर ह्या आठवड्यात पाऊस पडला नाही तर शेतकऱ्याच्या हातात काहीच पडणार नाही व जनावराला चारा सुद्धा राहणार नाही पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे तलावातील पाण्याच्या पातळ्या खोलवर गेले आहे परंतु सत्ताधारीमोदी सरकारच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळातील अपयशाबद्दलची माहिती देताना स्पष्ट केले की, मोदी सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात सरकार अपयशी ठरले आहे. विदेशी बँकातून काळा धन आणण्याचे व प्रत्येकांच्या खात्यात 15 लाख जमा करण्याचे, भ्रष्टाचार संपविण्याचे, आतंकवाद संपविण्याचे, महागाई व बेरोजगारी कमी करण्याचे, चीनचे अतिक्रमण थांबविण्याचे, सन 2022 पर्यंत देशातील सर्व बेघरांना पक्के घर देण्याचे, सन 2022 पर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पादनाला उत्पादन खर्चाच्या दीडपट किंमत देण्याचे व शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे, गंगा स्वच्छ करण्याचे, 100 स्मार्ट सिटी बनविण्याचे, डिजिटल इंडिया बनविण्याचे, बुलेट ट्रेन चालविण्याचे, हवाई चप्पल वाल्यांना हवाई जहाजात बसविण्याचे, डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत वाढविण्याचे, रेल्वेचे खाजगीकरण न करण्याचे, देशात संहिष्णुता कायम ठेवण्याचे, पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे, डिझेल पेट्रोल गॅसचे दर कमी करण्याचे, लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्याचे, आत्मनिर्भर भारत चे, स्टार्टअप



इंडियाचे व अशाप्रकारे दिलेली अनेक आश्वासने मोदी सरकारने मागील नऊ वर्षाच्या कार्यकाळात पूर्ण केलेली नाहीत. परंतु मागील सरकारच्या काळात किमान भाववाढ तरी केली जात नव्हती परंतु या सरकारच्या काळात उलट बेरोजगारी व महागाई मध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. उदा. 400 रुपयाचा गॅस 1100 रुपयाला, 55 रुपये लिटर डिझेल 95 रुपयाला, 70 रुपये लिटर पेट्रोल 105 रुपयाला 70 रुपयाचे खाद्यतेल 140 ते 200 रुपयाला, रेल्वेचे खाजगीकरण, काळा धन परत आला नाही व खात्यात 15 लाख जमा झाले नाही. शेतकऱ्यांच्या आंदोलनात 700 शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला, सार्वजनिक उपक्रमांची विक्री, कर्जबुडवेगिरी वाढली, पुंजीपतींचे कर्ज माफ करण्यात आले, जनसामान्यांवर जीएसटी च्या रूपाने कर लादून मूठभर पूजीपतींचे घर भरण्याचे काम सरकारने केले. हे त्यांचे अपयश लपविण्यासाठी मोदी सरकारच्या नववर्षाच्या कार्याची माहिती घराघरापर्यंत पोहोचण्याचे काम या सरकारने ने सुरू केलेले आहे. तसेच आपण काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे सरकार चे सुद्धा काम पाहिले तसेच अडीच वर्ष शिवसेनेचे सुद्धा काम पाहिले सर्व राजकीय नेते स्वतःच्या खुर्चीसाठी लाखो कोटी रुपये खर्च करत आहे परंतु शेतकऱ्यांसाठी काही कराल तयार नाही शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढतच आहे परंतु हे सरकार स्वतःच्याच खोट्या माहिती शेतकऱ्यांना पुरत आहे याला आपण शेतकऱ्यांनी प्रत्युत्तर म्हणून या सरकारचे अपयश व जानसामान्य विरोधी धोरणांची माहिती घराघरापर्यंत पोहोचविण्याचे काम शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य च्या सर्व सदस्यांनी करावे, असे आव्हान छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी केले निवेदन सादर करतेवेळी शेतकरी संघटनेचे फुलंब्री तालुकाध्यक्ष साईनाथ बेडके तसेच बाबुराव पाटील जाधव सोसायटी सदस्य इतर सदस्य हजर होते.

# नॅशनल चॅम्पियन स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवणाऱ्या तरुणाची मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथील रामजीनागर भागातील सामाजिक कार्यकर्ते बबन रमेश रोकडे यांचे भाचे दीपक मिलिंद कडूकार याने दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या नॅशनल चॅम्पियन शिप स्पर्धेत शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक पटकावले आहे. त्याबद्दल त्याचे ग्रामस्थांच्या वतीने मंगळवारी त्याचे जंगीस्वागत करण्यात आले. त्याच्या यशाबद्दल त्याचे सोयगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक-एस टी बसस्थानक- रामजीनगर मार्गे विठ्ठल रुखमाई मंदिर अशी घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. रस्त्यावर जागोजागी रांगोळी काढण्यात आल्या तसेच महिलांनी औक्षण करून सुभेच्छा दिल्या. तसेच रामजीनगर येथे एका कार्यक्रमात गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी त्याचे स्वागत केले. यावेळी माजी सैनिक मिलिंद कडूकार,शिवसेना तालुका प्रमुख दिलीप मचे, अण्णासाहेब देशमुख, पत्रकार भरत पगारे, रामराव रोकडे, विष्णू मापारी, संजय शहापुरकर, दिलीप तायडे, राजू माळी, सिकंदर तडवी, राजेंद्र गव्हाड, विजय सूर्यवंशी, अशोक वाघ, धर्मराज सोनवणे, प्रशांत वर्णकर, नगरसेवक राजू दुतोंडे, कृषी पीकविमा अधिकारी सुनील काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीत्यासाठी रमेश रोकडे,भागवत रोकडे, बबन रोकडे, दत्तू रोकडे, गजानन रोकडे, प्रकाश रोकडे, अण्णा जाधव, शंकर जेथे, बबलू चव्हाण, अनिल साळवे, राहुल जाधव विशेष परिश्रम घेतले. यावेळी शेकडो महिला - पुरुष बालगोपालांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सामाजिक कार्यकर्ते दत्तू रोकडे यांनी केले.

> माझे वडील भारतीय लष्करातुन सेवानिवृत्त असल्याने त्यांच्यापासून मला प्रेरणा मिळाली आहे . भविष्यात मला देशसेवा करायाची संधी मिळाल्यास मला अत्यानंद होईल . **दीपक मिलिंद कडूकार**



# 'त्या' गॅस एजन्सीवर अद्याप कारवाई नाही

## 15 सप्टेंबरपासून तहसीलसमोर आमरण उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील छत्रपती संभाजीनगर या मध्यवस्तीत श्रीराम इंडेन नावाची गॅस एजन्सी गोदाम आहे. या गोदामात मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडर साठा करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात गॅस गळतीचा वास येत आहे. यामुळे येथील नागरिकांच्या जीवाला धोका उत्पन्न होऊ शकतो. सदर गोदाम तात्काळ इतरत्र हलविण्यात यावा अशी मागणी शहरातील सामाजिक कार्यकर्ते रफिक तांबोळी यांच्या वतीने जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली होती. आठवडाभरात सदर गोदाम इतरत्र हलवल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला होता. मात्र आठवडा उलटूनही सदर गॅस एजन्सीवर प्रशासनाकडून कसलीही कारवाई करण्यात आली नसल्याने निवेदनकर्ते रफिक तांबोळी हे 15 सप्टेंबर पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहेत. याबाबतचे निवेदन त्यांनी आज तहसीलदारांना दिले. त्याचबरोबर सदर गॅस एजन्सी धारकांकडून ग्राहकांची मोठ्या प्रमाणात लूट करण्यात येत आहे. प्रत्येक गॅस सिलेंडरसाठी अतिरिक्त चार्ज घेण्यात येत आहे. शहरी भागात वीस रुपये, तर ग्रामीण भागात पन्नास रुपये अतिरिक्त चार्ज, घेऊन ग्राहकांची सर्रासपणे लूट करण्यात येत आहे. तसेच सिलेंडर पुरवठा करणाऱ्या वाहनावर दरपत्रक लावले जात नाही व कोणतेही सिलेंडर मोजून दिले जात नाही. त्यामुळे सदर एजन्सी धारकाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली होती. मात्र मागण्या पूर्ण न झाल्याने आता एजन्सी विरोधात आमरण उपोषण करण्यात येणार आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी परभणी, जिल्हा पोलिस अधीक्षक परभणी, तहसीलदार जिंतूर आदींना दिल्याचे म्हटले आहे.

# इगतपुरी ते बडनेरादरम्यान रेल्वेंची गती वाढणार

आधुनिक केसरी न्यूज


**अमरावती :** प्रवाशांना अधिक जलद गतीने संबंधित स्थानकावर पोहोचता यावे यासाठी मध्य रेल्वेतर्फे सुरक्षित प्रवासासह गाड्यांचा वेग अधिकाधिक कसा करता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. नुकत्याचच केलेल्या गती चाचणीत सहा रेल्वेगाड्यांनी इगतपुरी-भुसावळ-बडनेरा हे ५२६ किलोमीटरचे अंतर १३० किलोमीटर प्रति तास या वेगाने कापले.



लवकरच इगतपुरी-भुसावळ-बडनेरा दरम्यान एकूण ६७ रेल्वेगाड्या १३० किमी प्रति तास या गतीने धावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मध्य रेल्वेने १२२८९ /९० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर दुरांतो एक्स्प्रेस, १२१०५ /०६ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-गोंदिया विदर्भ एक्स्प्रेस आणि १२८५९ / ६० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हावडा गीतांजली एक्स्प्रेस या रेल्वेगाड्यांची अप आणि डाऊन मार्गावर गती चाचणी घेतली. २६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान घेण्यात आलेल्या या चाचण्या यशस्वी ठरल्या. डाऊन मार्गावर या एक्स्प्रेसने नियोजित अंतर ठरलेल्या वेळेपेक्षा २८ मिनिटे, तर अप मार्गावर अर्धा तास कमी वेळात कापले, अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

महाराष्ट्र Business Katta









# साहित्याचा कस्तुरी गंध



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**वि.स. खांडेकर हे नाव मला आधी कळाले असते; किंवा मी त्यांचे साहित्य आधी वाचले असते तर कदाचित ते एवढेच भावले असते का? वयाप्रमाने वाचन करण्याच्या प्रक्रिया बदलतात. त्यातून होणारे आकलन हे निराळ्या प्रकारचे असते. माझ्या वाचनाची सुरूवात ही ययाति या कादंबरी पासून झाली. ह्या कादंबरीने मला वर्षभर सोबत केली. अर्थात वर्षभरमी ही कादंबरी वाचली. किती मोहक असे वातावरण तो कालखंड होता. चार पात्रांनी परिपूर्ण झालेली ही कादंबरी मला मनापासून आवडली. ही कादंबरी स्वतःत परिपूर्ण होती असे म्हटले तरी हरकत नाही. ययाति वाचून झाली आणि मला प्रश्न पडला की इतक्या ताकदीचे लेखन कसे बरे कोण करू शकते? आपल्याला ह्या शब्दांनी तिने मला वर्षभर खिळवून ठेवले. पुढे विचार केला की आता जे काही वाचायचे ते खांडेकरांचेच साहित्य वाचायचे.**

ययातिनंतर मी अमृतवेल वाचली, नंतर हिरवा चाफा, सुखाचा शोध, अश्रू, पहिले प्रेम, सूर्यास्त, जळालेला मोहर अशी किती पुस्तके मी वाचली; पण खांडेकराच्या लेखणीत जी जादू आहे ती मला इतर कादंबरीमध्ये मिळालीच नाही. आता मधे अनेक पुस्तके मी वाचते पण खांडेकराच्या लेखनाने माझी वाचनाची भूक भागते. आपण ज्यावेळी वाचनप्रवास सुरू करत असतो त्यावेळी आपल्याला पुस्तकांची ओढ ही त्या पुस्तकातील चित्रामुळे होते, आणि जर पुस्तकात चित्र नसेल तर मग पुस्तकाचे मुखपुष्ठ हे उत्तम असले पाहिजे असा आपला आग्रह असतो. पण जसंजसे आपण पुस्तक वाचण्यात रंगत जातो तसंतसे पुस्तकातील चित्रापेक्षाही आपल्याला त्या पुस्तकातील सारं महत्वाचे वाटते. आणि एकदा का लेखन आवडतीचा झाला तर मग त्याच लेखनाची पुस्तके वाचायची असा आपला मानस तयार होतो.

मी पुस्तके वाचण्यास सुरूवात केली आणि पुढे मला वि.स.खांडेकर यांचे लिखान इतके जास्त आवडले की त्यांच्या सर्व कादंबऱ्या मी खरेदी केल्या. मला वि.स हे केवळ लेखन म्हणून नाही तर माणूस म्हणून श्रेष्ठ वाटतात. किती सहजपणे ते इतरांच्या मनातील गूढ काढून घ्यायचे. स्त्री आदर आणि तिच्या सौदंर्यचे वर्णन हे प्रत्येक लेखक हा आपल्या कसबीने करेलच यात शंका नाही पण खांडेकरांना स्त्री मन कळते. प्रत्येक स्त्री च्या मनात चालू असलेले द्वंद, तिचे प्रेम, तिचे भय, तिचे पतिभक्ती, संसारप्रेम, गर्विष्ठता, सजकता,



मोहकता, साधेपण, कारूण्य, बाबडेपण किती उत्तम प्रकारे त्यांना समजले. स्त्री आदर आणि तिला समजून घेण्याची वृत्ती प्रत्येक पुरूषाने बाळगली तर नक्कीच स्त्रीला तिच्या आदराचे स्थान मिळेल.



पण सारय़ाच पुरूषांना हे जमत नाही तुम्ही लेखक तर उत्तम होऊ शकताता पण तुमच्या जाण्यानंतरही तुमचे साहित्य प्रत्येक मनात अजरामर राहणे हे महत्त्वाचे असते. हे खांडेकरांच्या बाबतीत घडले. मला आवडलेल्या लेखकांपैकी ते एक आहे. त्यांच्या साहित्यातून ते रोज नव्याने भेटत राहतात. साहित्यिक वारसा जपवून ठेवावा. पण साहित्य जर उत्तम आणि मनाला भावणारे असेल तर जपवून ठेवावे असा आग्रह धरण्याची गरज भासत नाही. कारण या सर्व गोष्टी आपसूक घडत असतात. खांडेकर हे प्रतिभासंपन्न होते यात तिळमात्र शंका नाही. मला त्यांच्या बाबतीत आणखी एक गोष्ट फार महत्त्वाची आणि आवडती आहे. ती म्हणजे त्यांच्या कादंबरीतील वातावरण तो काळ मला अतिशय आवडतीचा आहे. सध्या वातावरण हे वेगळे जरी असले तरी मला त्यातील हा कालखंड हा अतिशय लोकप्रिय आहे. वाचनाची कस्तुरी ही माझे जीवन गंधाळ करून गेली आणि हा गंध जीवनात जपून ठेवण्यासारखा आहे.

# शासन आपल्या दारी उपक्रमावर करोडो रुपयांचा चुराडा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्र सरकारच्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमाची जोरदार चर्चा सुरु आहे. कार्यक्रमापेक्षा त्यासाठी केलेल्या जाहीरांतीमुळे हा उपक्रम चर्चेत आला आहे. शासन आपल्या दारी उपक्रमाचा नागरिकांना लाभ होत नसल्याची टिका विरोधकांनी केली होती. दरम्यान आता या उपक्रमासाठी करण्यात आलेल्या जाहिरातीचा खर्च समोर आला आहे. शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या जाहिरातींवर आतापर्यंत ५२ कोटी ९० लाख रुपये खर्च केल्याची कबुली राज्य सरकारने दिली आहे. 'शासन आपल्या दारी' उपक्रमाच्या अनुषंगाने शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी ५२ कोटी ९० लाख ८० हजार इतक्या खर्चास सरकारने मान्यता दिली आहे. विधानपरिषदेत सरकारने यासंदर्भात माहिती दिली होती.**

यापूर्वी विरोधकांनी शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या नावाखाली जनतेच्या कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप केला होता. या उपक्रमांतर्गत तहसील कार्यालय, पंचायत समितीचा आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, कृषी, एकात्मिक बाल विकास, भूमिअभिलेख, पशुवैद्यकीय आदी विभागांतर्गत येणाऱ्या सर्व सरकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला आहे.यामध्ये शिधापत्रिका, शासकीय प्रमाणपत्र (वय, राष्ट्रीयत्व, अधिवास, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला), मतदारनोंदणी, आधार नोंदणी व दुरुस्ती, संजय गांधी योजना, सलोखा योजना, प्रधानमंत्री मातृवंदन योजना, कुटुंबकल्याण योजना, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, कन्या समृद्धी योजना, विवाहनोंदणी, कुपोषित बालकांची तपासणी, जमीनमोजणी, भूमापन, प्रॉपर्टी कार्ड, कृषी अवजारांचे वाटप, बियाणे औषध वाटप, महा डीबीटी नोंदणी, जनावरांची तपासणी शिबिर, किसान क्रेडिट कार्ड, पशुसंवर्धन प्रशिक्षण, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, रमाई घरकुल योजना, सुकन्या समृद्धी योजना, आधार जोडणी आदी सरकारी योजनांचा समावेश आहे. है सर्व उपक्रम स्तुत्य व लोकांच्या कल्याणाच्या आहेत..मात्र हाच लाभ सरकारी कार्यालयातून व्हावा .महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांच्या फायद्यासाठी विविध योजनांची सुरुवात करत असते परंतु बऱ्याच नागरिकांना या योजनांची माहिती नसते तर बर्‍याचदा नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी सरकारी कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात व अनेकदा नागरिकांना यामुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागतो ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसाच वाया जातो व योजनांचा लाभ देखील मिळत नाही त्यामुळे शासनाने महाराष्ट्र राज्यातील सर्व जाती धर्मातील लोकांना शासनाद्वारे सुरु करण्यात आलेल्या सर्व योजनांचा कुठल्याही अडथळ्याविना लाभ घेता यावा या उद्देशाने शासन आपल्या दारी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.है सर्व मान्य मात्र या योजनेवर होणाऱ्या खर्चाचा सरकारने विचार केला का.? सरकार विविध योजना जाहिरातीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवत असते त्यामुळे सरकारी योजना लोकांना माहीत नसतात असे म्हणता येणार नाही. दरम्यान शासन आपल्या दारी योजनेला लोकांचा प्रतिसाद मिळाला असला तरी असे शासन दरबार का भरवावे लागतात..? खर तर लोकांची कामे करण्यासाठी शासकीय कार्यालये आहेत. तहशील कार्यालय व प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालय,भूमी अभिलेख विभाग,तहसील कार्यालय, आर टी ओ कार्यालय




असे विविध कार्यालये असताना लोकांची कामे या कार्यालयांमधून व्हायला पाहिजे. यासाठीच ही कार्यालये आहेत.मात्र सरकारी कार्यालयातून जनतेची कामे होत नसतात.होत असली तरी चिरीमिरी द्यावी लागते.कित्येक वर्ष, महिने,जनतेची फाईल कार्यालयात धूळ खात पडलेली असतात. मात्र शासकीय अधिकारी जनतेची कामे फारसे गांभीर्याने करत नसल्याने लोकांना शासकीय कार्यालयात खेटे खावे लागतात. सरकारी कार्याची स्थिती सरकारला माहित नाही असे नाही. सरकारी अधिकारी लोकांकडून पैसे घेऊन कामे करतात. लोकांची कामे सरकारी कार्यालतून वेळेवर होत नाही. शासकीय कार्यालयाची स्थिती सरकारला माहीत असताना देखील सरकार याबाबतीत फारसे गंभीर नसल्याचे दिसून येते. एखाद्या अधिकाराची तक्रार झाली तर त्या अधिकाऱ्याची थातूरमातूर चौकशी होत असते. शासकीय कार्यातून जनतेची कामे होत नसल्यामुळेच सरकारला शासन आपल्या दारी असे कार्यक्रम आयोजित करावे लागतात मात्र. अशा कार्यक्रमात करोड रुपये खर्च होतात शेवटी हा पैसा जनतेचा असतो ना.. शासन आपल्या दरबारी उद्देश निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केलेला आहे. हे जनतेपासून लपून नाही. प्रशासन गतिमान करण्याच्यदृष्टीने शासन आपल्या दारी हा उपक्रम हाती घेतलाअसे सरकार म्हणत आहे.मात्र निवडणुकीच्या तोंडावर जनते पर्यंत जाण्याचा आपली मते सुरक्षित राखण्याचा व सरकार लोकांप्रती किती जागृत आहे हा दाखविण्याचा प्रकार आहे. या अंतर्गत अधिकाधिक लाभार्थ्यांच्या सहभागासाठी जिल्हा प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले. विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार आदींसह अनेक लाभार्थ्यांना निरनिराळ्या योजनांच्या लाभासाठी हेलपाटे मारावे लागू नये हा उद्देश या योजनेचा असल्याचे सरकार छातीठोकपणें सांगत आहे. विशेष म्हणजे ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमांतर्गत शासकीय निर्धारित शुल्कात दोनशेवर योजनांचा लाभ कमीत कमी कागदपत्रांच्या आधारे जलद मंजुरी देण्याचा हा उपक्रम आहे. मात्र हा उपक्रम कितपत लोकांच्या सोयीचा ठरला हा विषय तितकाचा चर्चेचा व मूल्यमापन करण्याचा आहे.

# संस्कृत भाषेची निर्मिती, व्याप्ती आणि महत्त्व !

आधुनिक केसरी

**ज्या देववाणी संस्कृतने मानवाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवला, त्या देववाणीलाच कृतघ्न मानव विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील अनेक राजकीय नेते नष्ट करायला सरसावले आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी प्रत्येकानेच प्रयत्न केले पाहिजेत. संस्कृत भाषेचे सौंदर्य आणि थोरवी कळली पाहिजे या निमित्ताने हा लेख प्रपंच ! ‘संस्कृत’ भाषा कशी तयार झाली, ते सांगतांना पाश्चात्त्यांच्या नादी लागलेले काही जण म्हणतात, ‘पहिल्यांदा मानवाला ‘आपल्या तोंडातून ध्वनी येतात’, हे कळले. त्या ध्वनींच्या खुणा, खुणांची चिन्हे आणि त्या चिन्हांचीच अक्षरे झाली.**

त्यातून बाराखडी, वस्तूंची नावे, अशा तऱ्हेने सर्व भाषा, अगदी संस्कृत भाषाही निर्माण झाली.’ अर्थात हे सर्व खोटे आहे. ईश्वराच्या संकल्पाने ही सृष्टी निर्माण झाली. मानवाच्या निर्मितीनंतर मानवाला आवश्यक ते सर्व काही त्या ईश्वरानेच दिले. एवढेच नव्हे, तर मानवाला काळाप्रमाणे पुढे ज्याची आवश्यकता भासेल, तेही द्यायची त्याने व्यवस्था केली आहे. सृष्टीच्या निर्मिती पूर्वी ईश्वराने मनुष्यप्राण्याला मोक्षप्राप्तीसाठी उपयोगी पडणारी आणि चैतन्याने ओतप्रोत भरलेली अशी एक भाषा निर्माण केली. या भाषेचे नाव आहे ‘संस्कृत’. ‘स्त्री’ या शब्दाकरता नारी, अर्धांगिनी, वामांगिनी, वामा, योषिता, असे अनेक शब्द संस्कृत मध्ये आहेत. हा प्रत्येक शब्द स्त्रीची सामाजिक, कौटुंबिक आणि धार्मिक भूमिका दर्शवतो. संस्कृत भाषेचे शब्दभांडार एवढे प्रचंड आहे की, त्याची माहिती घ्यायला एक आयुष्य पुरे पडणार नाही.’ एका प्राण्याला, वस्तूला आणि देवाला अनेक नावे असलेली संस्कृत भाषा ! संस्कृतमध्ये प्राणी, वस्तू इत्यादींना अनेक नावे देण्याची प्रथा होती, उदा. बैलाला बलद, वृषभ, गोनाथ अशी 60 च्या वर; हत्तीला गज, कुंजर, हस्तिन, दंतिन, वारण अशी 100 च्या वर; सिंहाला वनराज, केसरीन, मृगेंद्र, शार्दूल अशी 80 च्या वर; पाण्याला जल, जीवन, उदक, पय, तोय, आप; सोन्याला स्वर्ण, कांचन, हेम, कनक, हिरण्य आदी नावे आहेत.’ सूर्याची 12 नावे, विष्णु सहस्त्रनाम, गणेश सहस्त्रनाम काही जणांना पाठही असतात. त्यातील प्रत्येक नाम त्या त्या देवतेचे एकेक वैशिष्ट्यच सांगते.

वाक्यात शब्द कोठेही असले, तरी वाक्याचा अर्थ बदलत नाही, उदा. ‘रामः आम्रंखादति ।’ म्हणजे ‘राम आंबा खातो’, हे वाक्य पुढीलप्रमाणे कसेही लिहिले, तरी अर्थ तोच रहातो – ‘आम्रं खादति रामः ।’ ‘खादति रामः आम्रं।’ या उलट इंग्रजीत वाक्यातील शब्दांचे स्थान बदलले की, निराळाच अर्थ होतो, उदा. ‘RAMA EATS MANGO.’ म्हणजे ‘राम आंबा खातो’, हे वाक्य ‘MANGO EATS RAMA.’ (असे लिहिले, तर त्याचा अर्थ होतो, ‘आंबा रामाला खातो.’) जेथे संस्कृतचे अध्ययन होते, तेथे संस्कृती वास करते. (‘देववाणी अशा या संस्कृतचे उच्चार जरी कानावर पडले, तरी आनंद वाटतो.’) संस्कृतिः संस्कृताश्रिता ।’ असे म्हणतात. याचा अर्थ आहे, ‘संस्कृती ही संस्कृतच्या आश्रयाला असते’, म्हणजे जेथे संस्कृतचे अध्ययन होते, तेथे संस्कृती वास करते. संस्कृतचा अभ्यास करणारी व्यक्ती ही संस्कृतीशील, सौजन्यशील असते.’

‘प्राचीन काळापासूनच संस्कृत ही अखिल भारताची भाषा म्हणून ओळखली जात होती. काश्मीरपासून लंकेपर्यंत वगांधारपासून मगधापर्यंतचे विद्यार्थी नालंदा, तक्षशीला, काशी आदी विद्यापिठांतून अनेक शास्त्रे आणि विद्या यांचे अध्ययन करत. या भाषेमुळेच रूदट, कैय्यट, मम्मट या काश्मिरी पंडितांचे ग्रंथ थेट रामेश्वरपर्यंत प्रसिद्ध पावले. आयुर्वेदातील चरक हा पंजाबचा, सुश्रुत वाराणसीचा, वाग्भट सिंधचा, कश्यप काश्मीरचा आणि वृंद महाराष्ट्राचा; पण संस्कृतमुळेच हे सर्व भारतमान्य झाले.’

‘राष्ट्रभाषा कोणती असावी’, याकरता संसदेत वाद झाला. दक्षिण भारताने हिंदीला कडाडून विरोध केला. एक फ्रेंच तत्त्वज्ञ म्हणाला, “अरे, तुम्ही कशाकरता भांडता ? संस्कृत ही तुमची राष्ट्रभाषा आहेच. तीच सुरू करा.’’ संस्कृतसारखी पवित्र देवभाषा तुम्ही घालविली. मग भांडणे होणार नाहीत तर काय ? आज हिंदुस्थानभर कहर आहे.’ देववाणीचा ध्वज आता जागतिक स्तरावर पोहोचला असून त्याचे श्रेय या भाषेसाठी पुढाकार घेणाऱ्या मंडळींना जाते. सर्व भाषांची जननी असलेली संस्कृत भाषा पौर्वात्यच नव्हे, तर पाश्चिमात्यांनाही आकर्षित करत आहे ! भारताचीच नव्हे, तर जगाचीच मूळ भाषा संस्कृत आहे आणि तिच्यापासून निघालेल्या सर्व भाषा प्राकृत आहेत ! संस्कृत ही देवभाषा असल्याने तिच्यात अपार चैतन्य आहे, ती अ-मृत आहे, अमर आहे !!’ कालीदास, भवभूती आदी महाकवींची प्रतिभा संस्कृत मध्ये फुलली. संस्कृतमध्ये चैतन्य आहे. संस्कृतमधील लिखाणाचा अर्थ कळला नाही, तरी तिच्यातील चैतन्य व सात्त्विकता यांचा फायदा होतो. संस्कृतमध्ये चैतन्य आहे. संस्कृत ही वाणी, मन व बुद्धी यांची शुद्धी करणारी भाषा आहे. आपल्या प्राचीन संस्कृत भाषेचे महत्त्व ओळखा ! हिंदु संस्कृतीचा ‘संस्कृत भाषा’रूपी चैतन्यमय वारसा टिकवण्यासाठी संस्कृत शिका, तसेच शाळेमध्येही ‘संस्कृत’ विषय शिकवण्यासाठी आग्रह धरा !

# एक देश एक निवडणूक; किती व्यवहार्य



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**केंद्र सरकारने १८ ते २२ सप्टेंबरला संसदेचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. या अधिवेशनात अतिशय महत्त्वाचा अध्यादेश काढण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. केंद्र सरकार या विशेष अधिवेशनात 'एक देश एक निवडणूक' याबाबतचं विधेयक मांडू शकतं. संसदेच्या दोन्ही सभागृहात त्यामुळे या विशेष अधिवेशनाला जास्त महत्त्व प्राप्त झालं आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणूका एकाच वेळी घेण्याची योजना असं या प्रस्तावचं स्वरूप आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची २०१४ मध्ये सत्ता आल्यानंतर एक देश एक निवडणूक याबाबतची चर्चा समोर आली होती. त्यानंतर वारंवार याबाबत चर्चा होत राहिल्या. एक देश एक निवडणूकसाठी भाजप आग्रही आहे.**

त्यामुळे याचबाबतचा अध्यादेश सरकार आणण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे देशात सर्व निवडणूका या आगामी डिसेंबर महिन्यातच होण्याची शक्यता आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. देशात एकाच वेळी निवडणूका घेण्याचं समर्थन करणा-यांनी दिलेली कारणे आणि खरंच ही कारणे व्यवहार्य आहेत का याचा आढावा घेणारा हा लेख. देशात १९५१-५२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि तिच्या बरोबरच सर्व राज्यांमध्ये त्यांच्या कायदेमंडळाच्या निवडणूकाही झाल्या. सरकारे बरखास्त न झाल्याने योगायोगाने १९६७ पर्यंतकेंद्राच्या व राज्यांच्या सार्वत्रिक निवडणूका एकाच वेळी झाल्या. मात्र केंद्राच्या आणि ाज्यांच्या निवडणूका एकाच वेळेस झाल्या पाहिजेत अशी काही संविधानात तरतूद नाही. मात्र, १९६८, १९६९ साली काही राज्यांच्या विधानसभा आणि १९७० साली लोकसभा विशिष्ट कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच बरखास्त झाल्याने चित्र बदलले. मुदतपूर्व निवडणूका घ्याव्या लागल्याने दर पाच वर्षांनी सगळ्या निवडणूका एकत्र होण्याचा प्रघात मोडला. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला आपला देश अजूनही या सरकार बरखास्तीच्या फेऱ्यांतून मुक्त झालेला नाही. वेगवेगळ्या निवडणूका फार खर्चिक ठरतात आणि म्हणून एकाच ठराविक वेळी निवडणूका व्हाव्यात असा युक्तिवाद केला जातो. एकाच वेळी निवडणूका घेण्याचं दुसरं समर्थन असे केले जाते की, वेगवेगळ्या निवडणूकांमुळे लोककल्याणाची धोरणं ठरवण्यात अडथळा येतो, कारण आचारसंहिता लागू होते. या आचारसंहितेचा बराच बागुलबुवा नेहमी उभा केला जातो. एकत्र निवडणूका घेण्यासाठी आणखी एक युक्तिवाद असा केला जातो की पंतप्रधान, मंत्री किंवा राजकीय पक्षांचे उच्च नेते अशा सगळ्यांवरच सतत प्रचाराचा भार पडतो आणि राज्यकारभार, नियमित राजकीय कार्य, सरकारच्या कामाचे मूल्यमापन, संसदीय कामकाज यात अडथळा येतो.या विधेयकामुळे निवडणूकीत दिलेली आश्वासने पाळण्यास सरकारला जास्तीत जास्त वेळ मिळेल.यातील आणखी एक युक्तिवाद म्हणजे, एकत्रित निवडणूका घेतल्यास राजकीय पक्षांना त्यासाठी सतत निधी उभारण्याची गरज भासणार नाही. तसं झाल्यास निधी उभारण्यासाठी राजकीय पक्षांकडून वापरले जाणारे हातखंडे कमी होतील. निवडणूकांवर होणारा खर्चाचा मुद्दा आपण मान्य केला तर मुळात निवडणूकाच नकोत किंवा त्या कमीत कमी व्हाव्यात असा निष्कर्ष कोणीही काढेल. प्रत्येक निवडणूकीवर होणा-या खर्चाचे कोट्यवधींचे आकडे बघितले ही आपले डोळे गरगरतात. मात्र कोणत्याही निवडणूकीवर होणारा खर्च हा ५ वर्षांसाठी होणारा एकूण खर्च आहे तसेच त्या निवडणूकीत मतदान करणा-या एकूण मतदारांची संख्या पाहिली असता आपल्या लक्षात येईल की प्रत्येक निवडणुकीत प्रती मतदार होणारा खर्च अत्यल्प आहे. उदाहरणार्थ सन २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत अधिकृत खर्च साडे सहा हजार कोटी झाला. पण आपण २०१९ मध्ये नोंदलेल्या एकूण मतदारांचा विचार केला तर ती नव्वद कोटी होती. याचा विचार करता हा अधिकृत खर्च नागरीका मागे व मतदारामागे पन्नास ते पंच्याहत्तर रुपये आहे तोही एकूण पाच वर्षांनी. केंद्र सरकारचा एका वर्षाचा अर्थसंकल्प हा अब्जावधी रुपयांचा असतो तेंव्हा पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणूकीवर जर काही कोटी खर्च होत असतील तर हा खर्च एका वर्षाच्या अर्थसंकल्पातील तरतुद पाहता नगण्य आहे. त्यामुळे




निवडणूकीवर ५ वर्षात (मध्यावधी झाली तरी) नगण्य आहे. शिवाय केंद्रात आणि राज्यांमध्ये एकाच वेळी निवडणूक झाली तरी मतपत्रिका, पेपर ट्रेल यासाठीचा खर्च तर वेगवेगळा करावा लागणारच. फक्त सुरक्षा दलांवरचा आणि प्रत्यक्ष निवडणूक कर्मचा-यांवरचा खर्च वाचेल. मग खर्चाची ओरड किंवा केला जाणारा गाजावाजा अर्थहीन ठरतो. आपली मतदार संख्या अमेरिका व युरोप खंडातील तीसहुन अधिक देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे याचाही विचार केला पाहिजे. शिवाय या साऱ्या अधिकृत खर्चातून लोक आपला मताधिकार बजावून आपला प्रतिनिधी निवडून देत असतात. सरकार निवडत असतात. निवडणूक घोषीत झाल्यानंतर आदर्श आचारसंहितेनुसार मोठे आणि लोकांवर प्रभाव पडतील असे धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत हे जरी खरे असले तरी निवडणूका साधारणपणे केव्हा होणार हे माहीत असल्यामुळे आचारसंहितेत न अडकता घोषणा कशा करायच्या हे तर सर्वच पक्षांनी चांगल्यापैकी शिकून घेतलं आहे, त्यामुळे ही अडचण काही खरी नाही. सतत निवडणूका लागल्याने राजकिय पक्षांच्या उच्च नेत्यांवर ताण येत असला तरी हा येणारा ताण केवळ राष्ट्रीय पक्ष म्हणून समजल्या जाणाऱ्या भाजप आणि काँग्रेस पक्षांच्या नेत्यांवरचा आहे. कारण हेच दोन पक्ष देशभर निवडणूका लढवतात. त्या-त्या राज्याच्या निवडणूकीचे वेगवेगळे वेळापत्रक असल्यामुळे दमछाक होते ती या दोन पक्षांची. बाकीचे पक्ष ठराविक राज्यांमध्येच लढतात. राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्षांशी जोमाने लढता यावे म्हणून तर हा एक देश एक निवडणूकीचा घाट तर घातला जात नाहीय ना? देशात एक देश एक निवडणूक हे धोरण अमलात आणायचे असेल तर अनेक उपद्व्याप करावे लागतील. अविश्वास ठराव मांडण्याच्या अधिकारावर मर्यादा आणावी लागेल. काही कारणानं राज्यात सरकार स्थापन होऊ शकत नाही, अशी स्थिती आली तर उर्वरित काळासाठी राष्ट्रपती राजवट लागू करावी लागेल. राज्यात जर फारच लवकर सरकार कोसळले तर निवडणूक घ्यावी, पण नव्या कायदेमंडळाची मुदत पूर्ण पाच वर्षे न ठेवता पाचातल्या उरलेल्या वर्षांच्या एवढीच ठेवावी लागेल. सर्व राज्यातील विधानसभा आणि लोकसभा निवडणूका घेण्यासाठी घटनेत बदल करावा लागेल म्हणूनच सरकार हे विधेयक आणत आहे. सरकारला एक देश-एक निवडणूक; विधेयकाची अंमलबजावणी करायची असली तरी सर्व राजकीय पक्षांचे मत विचारात घेणे गरजेचे आहे. हा निर्णय आर्थिक तसंच घटनात्मक निकषांऐवजी राजकीय दृष्टिकोनातून घेतला जाऊ शकतो. त्यामुळे अनेक राजकीय पक्ष याला विरोध करत आहेत. एक देश एक निवडणूक विधेयकाचं कायद्यात रुपांतर झाल्यानंतर डिसेंबर महिन्यात लगेच निवडणूका जाहीर होण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. आता हे कितपत शक्य आहे? ते आगामी काळ ठरवेल. पण ध्यातरी याबाबत पुन्हा वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. निवडणूकीवर होणाऱ्या खर्चापेक्षा संसदीय कामकाज व त्याची गुणवत्ता सुधारण्याचा आग्रह आपण धरला पाहिजे.कारण त्यात मोठी घसरण सुरू झाली आहे. एकाचवेळी निवडणूका झाल्या तर पैसा वाचेल हा निकष असू शकत नाही.

# प्रथा परंपरा फक्त स्त्रियांसाठीच का ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**आज आपण पाहतो की एक स्री वर्षभराचे व्रतवैकल्ये करते. ती उपवास करते. सा-या परंपरा प्रथा पाळते. तरीही ती सुखी राहात नाही. सुखी वाटत नाही. पुर्वीही स्रिया ह्या अशाच प्रकारे व्रतवैकल्ये करायच्या. पतीसाठी लांब आयुष्याची प्रार्थना करायच्या. परंतू बदल्यात काय मिळायचं त्यांना क्लेश, दुःख, सतीप्रथा.......खरंच जीवंतपणी त्यांना पतीच्या शरणावर जीवंत जाळलं जायचं आणि मोठ्या तो-यानं सांगीतलं जायचं की ती अमूक व्यक्तीची आदर्श पत्नी. ती त्याचेसाठी सती गेली. महत्वपूर्ण गोष्ट ही की ती सती जात नव्हती स्वतः होवून. परंतू आमचा समाज स्वतः आदर्श नसला तरी स्वतःला आदर्श मानणारा हा समाज तिला पर्यायानं जगू देत नव्हता. तिला पदोपदी त्रास देत होता. तिला बंधनात बांधत होता.**

तिच्या पतीच्या निधनानंतर लगेच तिची इच्छा असो वा नसो, तिचा साजश्रृंगार उतरवला जायचा. तिला पांढरी साडी दिली जायची. तिचं कुंकू पुसलं जायचं. पायातील जोडवे काढले जायचे. हातातील बांगड्या फोडल्या जायच्या आणि जर तिला पती शय्येवर सती जायचं असेल तर तिचं साजश्रृंगार उतरवलं जायचं नाही तर सोळा श्रृंगारांनी तिला नटवलं जायचं. चांगला भरजरी शालू परीधान करुन दिला जायचा. त्यातच नाकात मोत्यांची माळ आणि त्या पतीच्या शरणासोबत तिचीही मिरवणूक काढली जायची. त्यातच पतीच्या चितेसह तिचा अग्नीप्रवेश. या अग्नीप्रवेशाची आपण कल्पनाही करु शकत नाही की किती तिला परेशानी होत असेल जीवंत जळतांना. तिच्या वेदना ह्या तिलाच माहित असासच्या. त्यातच ती बाहेर येवू नये म्हणून काही काही ठिकाणी त्यांचे हातपायही बांधले जात पती शय्येवर टाकतांना. किती अघोरी प्रथा होती ती. त्यानंतर जी सती जात नसे. तिचा छळ केला जात असे. तिला राजसी सुख मिळत नव्हतं. तिला टोमणे मारले जात होते. समाज तिला बरोबर जगू देत नव्हता. काही काही घरी तर घराच्या चार भिंतीत तिला डांबून ठेवलं जायचं आणि परीवारातील लोक तिची इच्छा नसतांनाही सामुहीक बलत्कार करायचे. हे असं वैधव्य असायचं. म्हणूनच स्रिया आपल्या पतीच्या लांब आयुष्यासाठी कामना करीत की पती हा जास्त दिवस जगायला हवा. कारण पती जर जीवंत असेल तर कोणी तिला विधवा म्हणणार नाही. कोणीही तिच्यावर लांच्छन लावणार नाही वा कोणीही घरातील व्यक्ती तिच्यावर बळजबरी करुन सामुहिकपणे बलत्कार करणार नाही. आता तो काळ गेला. सतीप्रथा बंद झाली. लोकं आज सतीप्रथा पाळत नाहीत. परंतू प्रथा परंपरा आजही पाळतात. कारण पतीनं सुख द्यावं. परंतू आजचेही पती त्यांना खरंच सुख देतात का? तर याचं उत्तर नाही असंच आहे आजचेही काही काही पती आपल्या पत्नीला जुवारामध्ये हारतात व तिचा दारुसाठी वा इतर शौकासाठी सौदा करतात. आजचेही काही काही पती मरण पावताच त्या स्रियांना विधवेचा पोशाख परीधान करायला भाग पाडलं जातं. तिच ती पांढरी साडी, त्या बांगड्या फोडणे, ते जोडवे काढणे आणि कुंकू पुसणे आणि मग घरच्याच मंडळींचे बलत्कार. खरंच या प्रथा परंपरा पाळण्याचा एवढा जर फायदा होत आहे. तर ज्या पतीच्या लांब आयुष्याच्या कामनेसाठी एवढ्या प्रमाणात त्या पाळल्या जातात, तो पती अल्पावधीत का मरावा किंवा पतीनिधनानंतर तिला विधवेचं जीवन का जगावं लागावं आणि महत्वाचं म्हणजे एवढी व्रतवैकल्ये पाळून सुद्धा पतीनं पत्नीला का घरातून हाकलून द्यावं? ह्याच प्रथा परंपरा पाळतात ना स्रिया साधारणपणे ज्या पतीसाठी. त्या पतीनं दारु, जुगार, गांज्याच्या आहारी जावे काय? त्यानं त्या स्रीला मारझोड करावी काय? वैगेरे प्रश्न अनुत्तरीतच आहेत. महत्वाचं म्हणजे प्रथा, परंपरा चांगल्यासाठीच आहेत. पुर्वजांनी पाडलेल्या आहेत. त्या त्यांनी अगदी विचार करुनच पाडल्या असतील, त्याला वाईट म्हणू नये. परंतू त्या प्रथा परंपरा पाळण्यातून जर ती स्री संतुष्ट नसेल तर तिला त्या प्रथा परंपरा पाळण्याची बळजबरी का करावी? ती करु नये. कारण जी गोष्ट करण्यापासून किंचीतही फायदा होत नसेल तर ती गोष्ट करता कामा नये. त्याची बळजबरीही करता कामा नये. प्रथा परंपरेबाबत हेच आहे आणि मुख्य म्हणजे प्रथा परंपरा पाळायच्या पुरुषांसाठी. परंतू ज्या पुरुषांसाठी ती व्रतवैकल्ये करते, त्या

# जो संयमाची परीक्षा उत्तीर्ण होतो त्याची गुणवत्ता फळास येते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**संयमाची पराकाष्ठा यशाचा आरंभ असतो. सृष्टीवर संयमाची परीक्षा हि सर्वात जास्त कठिण परीक्षा असते. संयम कधी ढळेल हे कोणालाही खात्रीशीर सांगता येत नाही. नजर हटताच दुर्घटना घडते तसंच काहीसं संयमाच आहे. संयम संपला की घटना घडामोड घडण निश्चित असतं. उथळता हि कधीचं आणि कोणत्याही क्षेत्रात लाभदायक नसते .संयम कठिण आहे पण लाभदायक असतो. मान सन्मान अपमान हे नेहमी संयमाची परीक्षा घेत असतात पण जो संयमाची परीक्षा उत्तीर्ण होतो त्याची गुणवत्ता विद्वत्ता फळास येते. विद्वत्ता व गुणवत्ता हि कितीही प्रचंड मोठ्या प्रमाणात असली आणि संयम नसेल तर ही गुणवत्ता विद्वत्ता निरर्थक निरूपयोगी ठरत असते संयम हे जीवनातील उत्कृष्ट असं बळ असुन ते यशस्वी जीवनाचा पाया आहे.**

प्रगतीच पहिलं लक्षण संयम आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. मन ,बुद्धी, विचार या मध्ये संयम निर्माण झाला तर आयुष्यात यशोशिखरावर पोहचण्या पासुन आपल्याला कोणतीही शक्ती रोखु शकत नाही.महणुन संयम हे जीवनातील ब्रह्म अस्त्र आहे .त्याचा वापर आपण ज्या पद्धतीने करणार त्या पद्धतीने परीणाम आपल्याला पाहायला मिळणार म्हणून संयम गुणवत्ता आणि विद्वत्ता हा यशोशिखरावर पोहचण्यासाठी राजमार्ग आहे असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. निसर्गाच्या चक्रानुसार पृथ्वीवर जन्मला आलेला प्रत्येक व्यक्ती हा जवळपास सारखाच गुणवान, विद्वान असतो .परंतु आपल्या गुणवत्ता आणि विद्वत्ता आपण कोणत्या कार्यासाठी वापरतो त्यावर त्यावर त्याच महत्व अवलंबून असतं. गुणवत्ता आणि विद्वत्ता याला जर संयमाची जोड आपण देऊ शकलो तर आपलं जीवन यशस्वी उन्नत, प्रगत, आणि नावलौकिक करणार ठरत या मध्ये काहीच संदेह नाही. निसर्गाने पृथ्वीवर अनेक प्रकारचे जीव सजीव निर्माण केले आहेत. त्यापैकी मानव एक सजीव प्राणी असून निसर्गाने निर्माण केलेली प्रत्येक व्यक्ती जवळपास सारखीच असते थोडाफार अंशतः बदल शरीर रचनेत, चेहरा, उंची या मध्ये अंशतः बदल असु शकतो. फार मोठ्या प्रमाणात फरक अथवा तफावत आढळत नाही. निसर्गाने प्रत्येकाला समान प्रमाणात सर्व शारिरीक बाबी वाटप केल्या आहेत. अपवादाने काही व्यक्तिंना एखाद्या अवयव कमी जास्त प्रमाणात असतो. कुणाला ऐकायला येत नाही. कुणाला दिसत नाही. तसेच कुणाला बोलता येत नाही. त्याच प्रमाणे एखाद्याला एखाद्या अवयव नसेलही पण प्रत्येकाला मेंदू बुद्धी हि सर्वांना सम प्रमाणात निश्चितच दिलेली असुन. मेंदू मधील रचना घटक जवळपास सारखेच आहेत परंतु त्या मेंदू चा वापर आपण ज्या पद्धतीने करतो. त्यानुसार आपली विद्वत्ता ठरतो .आणि विद्वत्ता गुणवत्ता व संयम एकत्र असेल तर यशाचा त्रिवेणी संगम तयार होतो .गुणवत्ता आणि विद्वत्ता प्रचंड असूनही संयमा शिवाय यशाच्या शिखरापर्यंत पोहोचता येत नाही. अनेक विद्वान लोकांची उदाहरणे आहेत विद्वत्ता, आणि गुणवत्ता प्रचंड होती परंतु संयम नसल्याकारणाने त्यांना सुद्धा अपयशाचा सामना करावा लागला. वास्तविक गुणवत्ता विद्वत्ता आणि सयंम हा त्रिवेणी संगम ज्याच्याकडे आहे. तो सदैव यशोशिखरावर असतो. यशापर्यंत पोहचण्यासाठी फक्त गुणवत्ता आणि विद्वत्ता असुन चालत नाही.तर उच्च पराकोटीचा संयम खुप आवश्यक आहे.विषय कोणत्याही क्षेत्राशी निगडीत असो त्या क्षेत्रात आपलं नावलौकिक करण्यासाठी अथवा आपल अस्तित्व परस्थित करण्यासाठी संयमाची आवश्यकता नितांत आहे. त्याचबरोबर दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या क्षेत्रातील आपला वावर असतो अथवा त्या क्षेत्रात आपल्याला यशस्वी होण्यासाठी आपल मार्गक्रमण चालू असतं जस काला, क्रीडा, संस्कृती, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, नोकरी, रोजगार स्वयंरोजगार, यापैकी कुठल्याही क्षेत्रात आपल्याला यश संपादन करण्यासाठी अथवा आपलं नावलौकिक करण्याचा आपला मानस असेल तर गुणवत्ता, विद्वत्ता आणि संयम हा त्रिवेणी संगम अति आवश्यक आहे.



# वडोद बाजार येथे भुंजऱ्या मातेचा सण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे भुंजऱ्या मातेचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वडोद बाजार येथील धनगर व तागवले समाज यांचा पारंपारिक भुंजऱ्या मातेची सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी गावात भव्य मिरवणूक काढून साजरा करण्यात आला. वडोद वस्ती येथून मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली. मिरवणूक पाहण्यासाठी इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित असतात तर काही युवक या दांडिया खेळण्यासाठी सहभागी होतात. या मिरवणुकीत चेअरमन कडुबा मस्के, ग्रामपंचायत सदस्य शिवराम मस्के उपसरपंच गोपाळ वाघ, गोविंद पांडेजी पांडूरंग ब्रहमने, गंगाधर ब्राह्मणे, साईनाथ ब्राह्मणे, भागजी चिकटे, विलास म्हस्के रेशमंजी म्हस्के, राजू म्हस्के, राजू पांढरे, पत्रकार काळू म्हस्के, पांडूरंग म्हस्के, दोलात ब्राह्मणे, नामदेव कोतवाल, अंबादास ब्राहमने, धुपाजी म्हस्के, सुरेश म्हस्के, शेषराव ब्राहमने, जयसिंग केवट , हिरालाल केवट, मानिक मस्के, अजिनाथ ब्राह्मणे, दिलीप केवट, चंदन केवट, धनराज केवट, अण्णा मखरे सोमनाथ मस्के व विमलबाई केवट, सुनीता मगरे, बिलघे, इंदररबई केवट निर्मलाबई केवट, कांताबाई तागवल, मीना केवट, जयश्री केवट, भाग्यश्री केवट, रोहिणी मगरे, आशा मखरे, सुंदर केवट, अनिता बिलघे आदी महिला यावेळी मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. धनगर व तागवले समाज हा सण रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो पारंपरिक पद्धतीचा हा सण आजही ही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो या समाजातील मुली या माहेरी येऊन रक्षाबंधनाचा सण हा दुसऱ्या दिवशी भुंजऱ्या मातेचा सण म्हणून साजरा करण्यात येतो. या मिरवणुकीत युवक दांडिया खेळतात गुलालाची उधळण करीत भुंजर्या माता की जय असा जयघोष करीत ही मिरवणुकी मारुती मंदिराच्या समोरून वडोद बाजार येथील गिरजा नदीच्या पत्र जवळ विसर्जित करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मोठ्या उत्साहात धनगर व तागवाले समाजाचा भुंजऱ्या मातेचा सण साजरा करण्यात आला.

# विजेची ये-जा, नागरिक हैराण; अनेकांना आर्थिक फटका, पिकांना पाणी पोहचेना

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये तथा मंडळ मधे गत आठवडाभरा पासून महावितरण कंपनीकडून अचानक इम्रजन्सी भारनियमन प्रक्रिया सुरू करण्यात आली की काय? माहिती नाही परंतु विजेची सतत ये जा मुळे नागरिक हैराण परेशान झाले असुण पावसाअभावी पिकांना उपलब्ध पाणी देण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांकडून होत असताना मात्र विज अभावी पाणी पोहचत नाही तर विविध व्यावसायिकांना विजेचा आर्थिक फटका बसत असल्याचे चित्र आहे. गत आठवडाभरापासून येथे व परिसरात सर्कल महसुल मंडळमधे विजेच्या सततच्या ये जा ने नागरिक हैराण असून रात्रंदिवसात विज केंव्हा येईल व जाईल याची शाश्वती नसुण उकडा डास मछ्छरने नागरिक हैराण आहे तर पिठ चक्की पंक्चर व्यवसायी वेल्डर विजेवर अवलंबून असलेले व्यवसायीक विजेअभावी आर्थिक अडचणीत सापडले आहे. तर तालुक्यात ऑगस्ट महिना पावसाचा अभाव तथा खंड दडी मारल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तर ऐवढे तेवढे विहीरीत उपलब्ध पाणी पिकांना द्याची इच्छा असताना विजे अभावी तेही शक्य होत नाही. एकुण भयानक परिस्थिती असूण विजेचा मोठा तडाखा नागरिक शेतकरी व व्यवसाकीयाना बसत आहे. पावसाळ्यात ऑगस्ट महिना कोरडा गेला. पावसाळा सुरु होवुन तीन महिने झाले पुरासा समाधानकारक दमदार पाऊस नाही नदी नाले ओढे कोरडेठाक पडून आहे.

# आप युवा प्रदेशाध्यक्ष दौंडकर यांचा दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आम आदमी पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष मयूर मगन दौंडकर यांचा औरंगाबाद जिल्ह्याचा दौरा बुधवार दि.३० रोजी करण्यात आला. या दौऱ्यानिमित्ताने मयूर दौंडकर यांनी दौऱ्याची सुरुवात पैठण येथील नाथ दर्शनाने केली तर दौऱ्याची समाप्ती खुलताबाद तालुक्यातील श्री घृष्णेश्वर महादेवाच्या दर्शनाने केली या दौऱ्यात पैठण, गंगापूर, वैजापूर कन्नड आणि खुलताबाद या पाच तालुक्याला त्यांनी भेटी दिल्या. या दौऱ्यांमध्ये श्री दौंडकर यांनी युवा जिल्हाध्यक्ष सतीश लोखंडे यांच्या सहकार्याने १५०च्या वर नवीन पक्षप्रवेश करून घेतले. तसेच पक्ष बळकट करण्यासाठी पावले उचलत असल्याचे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.औरंगाबाद जिल्ह्यातील स्थानिक प्रश्न याची माहिती घेतली, तसेच दुष्काळा संबंधी शेतकऱ्यांशी चर्चाही केली, चारा छावण्या आणि पिण्याचे पाणी जनावरांसाठी तात्काळ उपलब्ध करून देण्याची शिफारसही ते करणार असल्याची माहिती दिली. शिवाय गंगापूर खुलताबाद चे आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षक मुख्यालय राहण्यासंबंधी जे धोरण अंगीकारले आहे त्यात त्यांनीही उडी घेतली असून अगोदर शाळा अद्यावत करा सुविधा द्या आणि मगच पुढच्या बाता मारा असेही दौंडकर म्हणाले. यावेळी आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते सुग्रीव मुंढे, महिला शहराध्यक्ष ज्योती जाधव, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष सय्यद सलाउद्दीन नहेरी, तालुका युवा उपाध्यक्ष सुरेश नवघरे, तालुका युवा सरचिटणीस अमोल भालेराव, शिवाजी पवार, कुलदीप चौधरी यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# इंदिरा महिला मंडळातर्फे पोलिस ठाण्यात रक्षाबंधन..!



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** इंदिरा महिला मंडळ सामाजिक संस्था धुळे यांच्या वतीने प्रभाताई परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली व महा एनजीओ फेडरेशन यांच्या संयोजनाने गोमय राखी आणून शहर पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधन साजरी करण्यात आले या ठिकाणी सर्व महिलांनी पोलीस बांधवांना राखी बांधून पेढे भरवून ओवाळण्यात आले. गोमय राखी ही गाईच्या शेणा पासून बनवली आहे पर्यावरण पूरक राखीमुळे प्रदूषण टाळण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. पर्यावरण पूरक राखी मुळे प्रदूषण टाळण्या बरोबरच बहिण भावाच्या हळुवार नात्याला अंकुर आता प्रत्यक्ष जमिनीतून अंकुरणार आहे अशाप्रकारे इंदिरा महिला मंडळ सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा प्रभाताई परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली असा उपक्रम राबवून समाजात चांगला संदेश देण्यात आला. या ठिकाणी उपस्थित इंदिरा महिला मंडळ धुळे सामाजिक संस्था व महा एनजीओ फेडरेशन प्रभा परदेशी अध्यक्ष, माळती सूर्यवंशी, प्रमिला जाधव, मनीषा पाटील, रूपा त्रिवेदी व आदी महिला उपस्थित होत्या.

# नांदा तांडाच्या सरपंचपदी वरदानसिंग चव्हाण बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा व नादांगाव या ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी वरदानसिंग ठाकूरसिंग चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. वरदानसिंग चव्हाण यांची बिनविरोध निवड जाहीर होताच भाजपाचे समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद उत्सव साजरा केला. नादांतांडा व नादांगाव या ग्रामपंचायतीच्या सरपंच यांनी आपसात ठरल्याप्रमाणे आपल्या सरपंच पदाचा राजीनामा आधीच दिला होता. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी ग्रामपंचायत नांदा तांडा व नांदा गाव ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी वरदानसिंग ठाकूरसिंग चव्हाण यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा सोयगाव पंचायत समितीचे विस्तार व ग्रामसेवक प्रदिप पाटील यांनी वरदानसिंग चव्हाण यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

निवड जाहिर होताच भाजपाचे माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील, शांताराम खराटे सावळदबारा येथील मान्यवर यांनी शाल श्रीफळ देऊन पुष्पहार घालून भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच मोरसिंग चव्हाण, उपसरपंच देवकाबाई गणेश राठोड,सदस्य सुमनबाई कवरसिंग चव्हाण, शोभाबाई मोहनदास राठोड, निर्मलाताई गणेश चव्हाण, लताबाई देवीदास चव्हाण, प्रकाश महारु राठोड, रोहीदास राठोड,कवरसिंग चव्हाण,मोहन राठोड, गणेश राठोड, विष्णू त्र्यंबक चव्हाण,,सोना मोहन राठोड,मोहन वाघा राठोड, गुरुमुख वाघा राठोड व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर गावकऱ्यांनी भव्य मिरवणूक काढत वरदानसिंग चव्हाण यांना पुढील आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच तरुण तडफदार वरदानसिंग चव्हाण यांनी दिली आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा गावकऱ्यांनी दिल्या.



# ई-पीक पाहणीला नेटवर्कचा अडथळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सोयगाव महसूल विभाग आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प दोन



वर्षापासून राज्यभर राबवण्यात येत आहे. मात्र ई-पीक पाहणी हे ॲप अनेक शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरतेय. ग्रामीण भागात नेटवर्कचा प्रश्न आणि अनेक शेतकऱ्यांना या ॲपव्दारे माहिती कशी भरायची याची पूर्ण माहिती नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी नोंदणीकडे पाठ फिरवत आहे. सोयगाव महसूल विभाग आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प राज्यभर राबवण्यात येत आहे. माझी शेती, माझा सातबारा, मी करेल माझा पिकपेरा या घोषवाक्याचा आधारे शासनाने मोबाईलद्वारे ऑनलाईन पद्धतीने दोन वर्षांपूर्वी राज्यात सुरुवात केली. काही जिल्ह्यांमध्ये पीक पाहणी ॲपला शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला. मात्र सध्या तरी सावळदबारा, नांदा तांडा देव्हारी डाभा टिटवी मोलखेडा पिंपळवाडी चारुतांडा देव्हारी घाणेगांव तांडा परिसरात शेतकऱ्यांना पीक नोंदणीसाठी अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. महिना उलटून गेला आहे. पण काही शेतकऱ्यांची ई पीक पाहणी राहल्याने आता पंधरा दिवसांची मुदत मिळाली आहे. शेतकऱ्यांनी आता ई पीक पाहणी करून द्यावी अशे आवाहन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे. ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांना शेतात जाऊन शेतातील पिकाचा लोकेशनसह फोटो अपलोड करावा लागतो. त्यामुळे एकाच वेळी अनेक शेतकरी ॲपवर नोंदणी करत असल्याने अनेकदा ॲप हँग होते. काही शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नाही. ज्यांच्याकडे आहे त्यातील अनेकांना ही माहिती भरण्याचे परिपूर्ण ज्ञान 1 नसल्याने त्यांची अडचण होते. त्यावेळी मार्गदर्शन करण्यासाठी कोणी नसेल तर सर्वच प्रक्रिया ठप्प होते. त्यामुळे ई-पीक बद्दल योग्य मार्गदर्शन सोयगाव महसूल विभाग व कृषी विभाग करत आहे.

**शेतकऱ्यांना महसूल विभाग मार्गदर्शन करणार :** शेतकऱ्यांनी आता घाबरुन जाऊ नये पंधरा दिवसांची मुदत मिळाली आहे आणि आजूक पण पंधरा दिवसांची मुदत मिळू शकते . ईपीक नोंदणी ही सातबारा उताऱ्यावर नोंद होणार पुन्हा नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांना गरज भासणार नाही . महसूल विभागाचे अधिकारी मदत करतील व तुमचा सातबारावर नोंद होऊन जाईल तुम्हाला काही अडचण येणार नाही पण शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करून द्यावी . नोंद न केल्यास ते क्षेत्र पडीत धरल्या जाईल . नुकसान भरपाई, विमा लाभ भेटणार नाही .
**मोहनलाल हरणे, सोयगाव, तहसीलदार**

# कडक उन्हाचा तडाखा, पावसाचा पोबारा, बळीराजा चिंताग्रस्त

## दिंडोरी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यात सध्या कडक उन्हाचा तडाखा आणि पावसांने केलेला पोबारा या समीकरणाने तालुक्यातील खरीप हंगाम धोक्याची घंटा वाजवत आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम हा बळीराजांला भयग्रस्त वाटु लागला आहे.

पावसाळ्यांची जवळजवळ ८५ दिवस उलटून गेले तरी दमदार पावसांची हजेरी तालुक्यात न झाल्याने मोठ्या हिंमतीने पेरणी केलेल्या पिकांचे काय होणार? असा चिंताग्रस्त प्रश्न सध्या बळीराजांला भेडसावत आहे. धरणांचा तालुका, पावसांचे माहेरघर, इतर तालुक्यातील नागरिकांना पाणी देणारा दिंडोरी तालुका हा सध्या दुष्काळजन्य परिस्थिती जीवन जगत आहेत. कोरोना कालखंडात आर्थिक कोंडीत सापडलेला शेतकरी वर्ग यंदाच्या खरीप हंगामात आपली आर्थिक बाजू मजबूत करील अशी आशा असतांना झाले मात्र उलटे. त्यामुळे आर्थिक कोंडीत सापडलेल्या बळीराजांला न्याय केव्हा मिळणार अशी आर्त हक्क तालुक्यातील शेतकरी वर्गातुन निघत आहे. तालुक्यातील खरीप हंगाम पेरणीच्या क्षेत्रात जवळपास ९५ ते ९८ टक्के पेरणी ही पुर्ण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. परंतु पावसाळ्यात फक्त दोन नक्षत्रे बरसले व काही सर्व पावसांचे नक्षत्रे ही कोरडे गेल्याने पेरणी केलेल्या पिकांनी आता पिवळेपणा व करपयला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता पाऊस जर नाही झाला तर यंदाचा खरीप हंगाम हा वाया जाणार या भीतीने तालुक्यातील बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे.

अतिवृष्टी, अवकाळी परिस्थिती, दुष्काळ अशा नैसर्गिक संकटांतुन सावरण्यासाठी शासनाने यंदाच्या खरीप हंगामापासुन नाममात्र एक रूपयांमध्ये शेतकरी वर्गाला पिक विमा योजना सुरू केली. या योजनेला तालुक्यातील शेतकरी वर्गाने चांगला प्रतिसाद दिला आहे.

आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांच्या पिकांला संरक्षण मिळावे म्हणून प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू करण्यात आली. या योजनेत केंद्र ,राज्य सरकार आणि शेतकरी यांच्या सामायिक हिश्श्यातुन शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ दिला जातो. या योजनेत तालुक्यातील शेतकरी वर्गाने चांगले पाऊल उचलून प्रतिसाद दिला आहे. परंतु आता यंदाच्या या दुष्काळ जन्य परिस्थितीमुळे ही पीक विमा तालुक्यातील बळीराजांला आर्थिक संजीवनी ठरेल का ? असे बोलले जात आहे.



**खरिपाच्या पिकांनी टाकल्या माना , जमिनीला पडल्या भेगा :** सध्या पावसांने आपला लहरीपणा दाखवत पोबारा केल्याने सर्वच पिकांनी माना टाकल्या असुन जमिनीला भेगा पडल्याने आता खरीप हंगामातील पिके भुईसपाट होणार असल्याचे चिन्हे पाहायला मिळत आहे .पाऊस पडण्याचे कुठलेच वातावरण तयार नसल्याने कडक उन्हाच्या तडाख्यात पिके आपल्या माना टाकत आहे .त्यामुळे यंदा मका, सोयाबीन, भुईमूग, मुग,बाजरी,ज्वारी यांच्या उत्पादनांवर यांचा विपरीत होणार असे भय निर्माण झाले आहे .तर वांगी,कोथिंबीर, व इतर भाजीपाला ही कवडीमोल भावात विका लागत असल्याने बळीराजांच्या आर्थिक आधार तुटला आहे .तसेच सध्या पाऊस नसल्याने जनावरांच्या चा-यांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर उदभवत असल्याने त्यांचा दुध व्यवसायांवर विपरीत प्रमाण दिसून येत आहे .

दिंडोरी तालुक्यात मागील काही दिवसांपासून पावसांने आपला लहरीपणा दाखवल्यामुळे तालुक्यातील संपूर्ण गावांमधील खरीप हंगाम धोक्यात आला आहे .त्यामुळे बळीराजांवर आर्थिक कोंडीची संकटमय मालिका तयार झाली आहे .यातुन शेतकरी वर्गाला दिलासा देण्यासाठी मायबाप सरकारने व शासनाने सक्तीची बँक वसुली थांबवी त्यामुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळेल . **संतोष रहेरे( माजी सरपंच, अंबानेर, ता .दिंडोरी )**



# कन्नड, सोयगावमध्ये दुष्काळ जाहीर करा

## संजनाताई जाधव यांचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सोयगाव मतदार संघामध्ये पाऊस न झाल्यामुळे शेतकरी अतिशय हवालदिल झालेला आहे पावसा अभावी सर्व पिके सुख व करपू लागली आहे काही ठिकाणी पाण्याचे प्रश्न निर्माण होत आहे जनावराचा चाऱ्याचा ही प्रश्न ऐरणीवर आहे म्हणून कन्नड सोयगाव तालुका हा दुष्काळ म्हणून जाहीर करावा, असे निवेदन केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांची कन्या संजनाताई जाधव यांनी तहसीलदार विद्याचरण कडवकर यांना दिले. यावेळी देविदास मनगटे, साईनाथ आल्हाड, बाबुराव बनकर, शिवराज शेळके, कृष्णा बोरसे, गणेश साळुंखे, सिद्धेश्वर झाल्टे, कृष्णा हार्दिक, सिध्दार्थ निकाळजे, रवी कवडे, रामेश्वर धनगर इत्यादी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# प्रशांत डिक्कर यांना शोधून पूरग्रस्तांच्या मागण्या मान्य करा

## अन्यथा १ सप्टेंबरपासून साखळी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** पूरग्रस्थांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय जळगाव जामोद यांचे कार्यालयासमोर २८ ऑगस्टपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. महाविकास आघाडिसह तालुक्यातील शेतकरी वर्गाचा मोठ्या प्रमाणावर या आंदोलनाला पाठिंबा मिळत होता. या अन्यत्याग आंदोलनाची प्रशासनालाही धडकी भरली होती. तहसीलदार, एस.डी.ओ.यांचेसोबत उपोशनकर्त्यांची एक दोन वेळा चर्चाही झाली पण त्यातून ठोस असा मार्ग निघाला नाही. त्यामुळे जो प्रयत्न पूरग्रस्थांच्या, शेतकऱ्यांच्या मागण्या पुर्ण होत नाही तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन सुरूच राहणार असा इशारा प्रशांत डिक्कर यांनी प्रशासनाला दिला होता.

२२ जुलै रोजी जळगाव जामोद आणि संग्रामपूर तालुक्यातील सातपुड्याच्या डोंगरात ढगफुटी होवून शेतीचे आणि नदिनाल्याच्या काठावर राहणाऱ्या लोकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. शेतीसह पूरात घरादाराच,जणावराच प्रचंड नुकसान झाले. पण प्रशासनाकडून चोविस तासाच्या आत मिळणार सानुग्रह अनुदान लोकांना मिळाले नाही. ज्याही लोकांना अनुदान मिळाले ती रक्कम अतीशय तोडकी होती. त्यातही मोठ्या प्रमाणावर घोळ झाला.खरा लाभार्थी त्यापासून वंचित राहिला.शेतीसंदर्भात कुठलच अनुदान मिळाल नाही त्यासाठीच स्वाभिमानी शेतकरी संघटणेचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते.

या आंदोलनाला शिवसेनेचे गजानन वाघ, काँग्रेसच्या नेत्या स्वातीताई वाकेकर, अविनाश उमरकर वंचीतचे संतोष गवई, सुनील बोदळे यांचेसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी आंदोलनाला पाठिंबा देवून प्रत्यक्ष अन्नत्याग आंदोलनस्थळी भेटी दिल्या होत्या.

सदर आंदोलन चीघळण्याची दाट शक्यता होती म्हणून पोलीस प्रशासनही याकडे जातीने लक्ष देवून होते. ३१ ऑगस्टच्या भल्या पहाटे चारच्या दरम्यान उपोषण मंडपातून प्रशांत डिक्कर गायब झाले. ही बातमी काही क्षणात सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर पसरली. प्रशांत डिक्कर यांचा लढा पूरग्रस्थासाठी होता. शेतकऱ्यांच्या,पूरग्रस्थांच्या मागण्यासाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केलेला नेता जर रात्रीअपरात्री उपोषण मंडपातून बेपत्ता होत असेल तर लोकशाहीसाठ ही बाब मारक आहे.

यासाठीच महाविकास आघाडिमधील शिवसेनेचे गजानन वाघ, काँग्रेसच्या नेत्या ज्योतीताई ढोकणे, वंचीतचे सुनिल बोदडे, प्रकाश्स भिसे यांनी प्रशांत डिक्कर यांचा तात्काळ शोध घ्यावा व पूरग्रस्थांच्या मागण्या मान्य कराव्या अन्यथा १सप्टेंबर पासून आपल्या कार्यालयासमोर मागण्या होई प्रयत्न साखळी आंदोलन करण्याचा ईशारा ३१ ऑगष्ट रोजी उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

सदर निवेदनावर गजानन वाघ,ज्योतीताई ढोकणे,प्रमोद सपकाळ, सुनील बोदळे,रतन नाईक,प्रकाष भिसे,सय्यद बाहोद्दीन,राजूभाऊ वानखडे, संदीप माणकर,यांच्या स्वक्षऱ्या आहेत.तर रोशन गजानन देशमुख रा.निरोड,तालुका संग्रामपूर यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला रिपोर्ट देवून प्रशांत डिक्कर यांचा शोध घेण्याची मागणी केली आहे.

# दिव्यांग बांधवांसाठी शासन आपल्या दारी योजनेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** नांदेड जिल्ह्यातील प्रहार दिव्यांग जनक्रांती संघटनेचे जिल्हाप्रमुख विठ्ठलरावजी मंगनाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शासन आपल्या दारी योजने अंतर्गत दिव्यांग बांधवासाठी या योजनेचे फॉर्म किनवट तालुक्यातील मौजे ईरेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे दि. ०१ सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता सर्व दिव्यांग बांधवांनी फार्म भरुन प्रमाणपत्र UDID कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट फोटो, जातीचे प्रमाणपत्र, बँकेचे चालू पासबुक प्रत, मोबाईल नंबर व ईतर कागदपत्रे जोडून देण्यात यावे. यावेळी मौजे ईरेगाव प्रहार दिव्यांग क्रांती संघटना किनवट तालुक्यातील सर्वच दिव्यांग बांधवांनी वेळेवर उपस्थित राहुन जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ग्रामसेवक जी. एन. दसकमवार, सरपंच, गोरे, कांडलीकर पंचायत समिती किनवट उपसरपंच, राम गंन्टलवाड, ग्रामपंचायत सदस्य देवराव मेटकर बालाजी मिरासे माजी सरपंच राम गंन्टलवाड व



गणपत मोहिते, अर्जुन खोकले, प्रल्हाद बोईनवाड, सेवक परसराम मेटकर, विजय धबडगे आणि प्रहार दिव्यांग क्रांती संघटना गाव शाखा ईरेगाव येथील दिव्यांग बांधवांची उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती जेष्ठ पत्रकार तथा तालुका प्रसिद्ध प्रमुख दशरथ पुंजाराम अंबेकर, उज्वलाबाई पेन्टेंवाड, खंडू संतोष मिराशे, अनिल रामराव मार्गीरवाड, पुजाबाई मदेवाड, नामदेव दत्ता गोरे, परमेश्वर दिगंबर तोकलवाड सह मौजे ईरेगाव येथील दिव्यांग बांधव आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामपंचायत कार्यालय यांनी आहे.

# समाजाच्या मागण्या त्वरेने मान्य करण्यात याव्यात : चर्मोद्योग कामगार सेना

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** चर्मकार समाजाच्या प्रलंबित मागण्या संदर्भात राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे चर्मकार समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींची विशेष बैठक मंत्रालयात नुकतीच झाली. त्यावेळी मयुर कांबळे यांनी NSFDC नवी दिल्ली यांची बंद असलेली कर्ज योजना पुर्ववत सुरु व्हावी तसेच महामंडळामधील रिक्त पदांची भरती व्हावी याकरीता चर्मोद्योग कामगार सेनेमार्फत प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला होता व त्याची दखल घेत महामंडळामधील १०९ रिक्त पदांची भरती करीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली व NSFDC नवी दिल्ली यांची बंद असलेली कर्ज योजना पुर्ववत सुरु करण्यात आली त्याबद्दल सामाजिक न्याय विभाग व संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले व चर्मकार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महामंडळाशी संबंधित असणाऱ्या प्रलंबित समस्या मागण्या बैठकीत मांडल्या. महाराष्ट्र शासनामार्फत गटई कामगारांना देण्यात येणारे 'मोफत पत्र्याचे स्टॉल' अंतर्गत मुंबई शहरात स्टॉल मिळावे याकरीता प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी व मुंबई बाहेरील पात्र कामगारांना स्टॉलचे वाटप करण्यात यावे. बैठकीस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव श्री. सुमंत भांगे, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापक धम्मज्योती गजभिये, बार्टीचे व्यवस्थापक सुनील वारे, मयुर कांबळे, संजय खामकर यांच्यासह भट्टु अहिरे, सीमा लोकरे, अशोक बागडे, स्वाती पोपट, विनोद सातपुते, शुभांगी डोके, महाराष्ट्रातील विविध संस्थेचे पदाधिकारी, समाज बांधव व चर्मोद्योग कामगार सेनेचे शिष्ट मंडळ उपस्थित होते. या बैठकीत मांडलेल्या मुद्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत महामंडळ स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात चर्मकार समाजाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास होईल अशी ग्वाही महामंडळाच्या व्यवस्थापकांनी दिली. चर्मोद्योग कामगार सेनेमार्फत चर्मकार समाजाच्या न्याय्य - हक्कांसाठी प्रशासनाकडे केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत अधिकाऱ्यांनी आश्वासित केले त्याबद्दल मयुर कांबळे यांनी उपस्थितांचे पुनःश्च आभार मानले.

# बीडीओंच्या दालनात संतापलेल्या पालकांनी भरवली शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** तालुक्यातील आरडव येथील जिल्हा परिषद शाळेवर गेल्या अडीच वर्षापासून कायम स्वरूपी शिक्षक नसल्याने संतापलेल्या पालकांनी आपल्या पाल्यांसोबत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यु. एस. देशमुख यांच्या दालनात विद्यार्थ्यांची शाळा भरवली यावेळी विद्यार्थ्यां सोबत सामाजिक कार्यकर्ते शैलेश सरकटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधाकर ढ़ाकने, विनोद सरकटे, शरद मोरे, जगदीश नरवाड़े, कडूजी मोरे, अरुण मोरे, अनिल येवले, शेषराव मोरे, रामप्रसाद ढाकने, तुकाराम आघाव, किशोर काळे, स्वप्निल मोरे, पंढरी मोरे, कैलास ढाकने इत्यादि पालक उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पालकांनी जोपर्यत कायमस्वरूपी शिक्षक मिळत नाही तो पर्यत पंचायत समितिच्या आवारातून न जाण्याचा पवित्रा घेतल्याने सहाय्यक गट विकास अधिकारी शरद घुगे, केंद्र प्रमुख जंगलसिंग राठोड सर, संतोष मुंढे, गजानन कुंभारे, पंचायत समितीचे अधीक्षक रवींद्र मापारी यांनी पालकांची अड़चन लक्षात घेऊन जांबुल जिल्हा परिषद शाळेवरील अतिरिक्त शिक्षक विष्णु भिवाजी तारे यांची आरडव येथील शाळेवर तात्काळ नियुक्ति केली.

१) लोणार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेवरील १४० शिक्षकांकडे मतदार यादी निरीक्षकाचे ( बीएलओ ) अतिरिक्त काम सोपवन्यात आले आहे .त्यामुळे शिक्षकांना अध्यापनासाठी वेळ मिळत नाही .

२) आरडव येथील शाळेवर जळगाव जामोद तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेवरील शिक्षक पडळकर यांची ऑनलाइन बदली झाली आहे . मात्र जळगाव जामोद येथील शाळेवर पर्यायी शिक्षक नियुक्त न झाल्याने पडळकर यांना सदर शाळेवरुन कार्यमुक्त आलेले नाही .

३) आरडव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये १ ते ४ पर्यंत वर्ग असुन ४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहे .अडीच वर्षापासून कायमस्वरूपी शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे .

४) तालुक्यात शिक्षकांच्या १४ पद रिक्त असुन १३ शिक्षक अतिरिक्त आहे . तर २१ सेवानिवृत्त शिक्षकांचे अर्ज जिल्हा स्तरावर पाठवन्यात आले आहे . मात्र अद्याप पर्यंत या अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने ही पदे अजूनही रिक्त आहे .

५) तालुक्यातील उपलब्ध असलेल्या १३ अतिरिक्त शिक्षकां पैकी एका शिक्षकाची आरडव येथील शाळेवर शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत नियुक्ति करण्यात आली आहे .



शासनाने जो सेवानिवृत्त शिक्षकांना परत मानधन तत्वावर सेवेत घेण्याचा निर्णय घेतला आहे त्याची त्वरित अंमल बजावणी केल्यास अनेक विद्यार्थी जे शिक्षणापासून वंचीत राहिल्याने त्यांचा शैक्षणीय दर्जा घसरत चाललेले आहे व अनेक पालकांनी अशी अवस्था असल्याने आपले मुलांना खाजगी शाळेत प्रवेश देत आहे या अवस्थे मुळेच जिल्हापरिषद मधील विद्यार्थी यांची संख्या दिवसेंदिवस घटत चललेली आहे व शाळा बंद होण्याच्या मार्गवार आलेल्या आहे त्या तात्काळ निर्णय घेऊन शिक्षणाची भरती करणे आवश्यक आहे .

**उमेश एस .देशमुख, गट विकास अधिकारी पंचायत समिती, लोणार**



# वंचित पक्षातर्फे 'विमुक्त दिन' काटशेवरी फाटा येथे उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** 31 ऑगस्ट रोजी खुलताबाद तालुक्यातून विविध गावातील व समाजाचे लोक एकत्रित येऊन संयुक्तरित्या भटक्या "विमुक्त दिन" साजरा करण्यात आला सविस्तर माहिती अशी की, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर प्रदेश अध्यक्ष मा. रेखाताई ठाकूर महिला आघाडी प्रदेश महासचिव तथा औरंगाबाद जिल्हा प्रभारी मा. अरुंधती ताई शिरसाठ, मराठवाडा अध्यक्ष मा. अशोक हिंगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद पश्चिम जिल्हा अंतर्गत खुलताबाद तालुक्यातील काटशेवरी फाटा येथे "विमुक्त दिन" साजरा करण्यात आला असून या ठिकाणी खुलताबाद तालुक्यातून विविध गावातील विमुक्त भटक्या जाती-जमातीचे प्रतिनिधी व लोकसंख्या मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षः- मा. पुनम राठोड (युवा नेते बंजारा समाज) प्रमुख मार्गदर्शक योगेश गुलाबराव बन, सतीश गायकवाड बाबा पटेल (जिल्हा संघटक) निमंत्रक गोपाल सुरवसे (युवा नेते) आयोजकः- मुक्तार भाई सय्यद (खुलताबाद तालुका अध्यक्ष) व सर्व कमिटी. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व जिल्हाध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या विविध समाजाची कार्यकर्त्यांनी जसे विजय लालू राठोड, सुदाम धनसिंग जाधव, प्रभाकर तोताराम जाधव, शिवलाल पुरामन जाधव, पुनमचंद मंगलाल जाधव, अशोक आबाराव भालेराव, शरद उत्तम भालेराव, जितेंद्र रतन जाधव, उमाकांत बुटेमाळी, अनिल काशिनाथ चौधरी, शेषराव शंकर सुरे, साहेबराव तुकाराम मावस, उत्तम मारुती भालेराव, अशोक शंकर सुरे या सर्व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला असून यावेळी तालुका पदाधिकारी राजाराम घुसाळे, अण्णा बनकर, रवी जाधव, सुरेश गवळी, अकबर शेख, अरुण गायकवाड, रवी अण्णा, कडूबा सोनवणे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते व विविध भटक्या विमुक्त समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बस थांबत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा ठिय्या

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** धरणगाव ते एरंडोलदरम्यान बांभोरी-टोळी (ता. धरणगाव) येथील स्थानकात बस थांबत नसल्याने गुरुवारी विद्यार्थ्यांनी चक्क रस्त्यावरच ठिय्या मांडून आंदोलन केले. शिवसेना ठाकरे गटाच्या सहसंपर्कप्रमुखांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून समस्या जाणून घेत थेट अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. अधिकाऱ्यांनी समस्या जाणून सोडविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. बांभोरी-टोळी येथील १५० ते २०० विद्यार्थी धरणगाव येथील शाळा-महाविद्यालयांत शिक्षण घेत आहेत. रोज ते गावातून बसने प्रवास करीत धरणगावला येतात. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून सकाळी दहा ते दुपारी एक या वेळेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बांभोरी-टोळी येथील स्थानकात बस थांबत नव्हत्या. तेथून जात असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सहसंपर्कप्रमुख गुलाबराव वाघ, युवासेनेचे जिल्हाप्रमुख नीलेश चौधरी, संतोष सोनवणे, गजूभाऊ महाजन, शहरप्रमुख भागवत चौधरी, नंदू पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी थांबत आंदोलनकर्त्यांशी संवाद साधत समस्या जाणून घेतली.

# बालकांचे खरे रक्षणकर्ते समतोल प्रकल्प टीम

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** येथील केशव स्मुर्ती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्प बाल सहायता केंद्राच्या माध्यमातून भुसावळ व जळगाव रेल्वे स्थानकावर भीक मागणाऱ्या, नशा करणाऱ्या भाऊगर्दीत अचानक रेल्वे मधून सुटलेल्या, भावनेच्या भरात सोडलेली, रागावून घर सोडलेल्या, ताटातूट झालेल्या, आधाराला पारखी झालेली, अशाच अभांग्याचा शोध घेऊन त्यांचे समुपदेशन करत समाजाचा मुख्य प्रवाहात आणण्याचे, या बालकांना कुटुंबाशी जोडण्यासाठी, माणूस म्हणून जगविण्यासाठी देवदूत कार्य केशव स्मुर्ती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्पाच्या माध्यमातून चालते. , या सात वर्षात प्रकल्पाच्या माध्यमातून 3300 हुन जास्त मुला - मुलींचे रक्षण करण्याचे कार्य या टीमने व्यवस्थित रित्या पार पाडले आहे. रस्त्यावर राहणाऱ्या भीक मागून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या समाजातील तळागाळातील वंचित मुले, ही मुले पण आपल्या समाजातीलच आहेत, आपल्या घरातीलच आहेत, हे कोणी वेगळे नाहीत. फक्त वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले त्यामुळे वेगवेगळी वर्गीकरण तयार झाली, पण मुले ही मुलेच असतात, व मुले ही देवा घरची फुले , तुमची आमची मुले सारखीच असतात. यावेळी समतोल प्रकल्पाच्या टीम सदस्य प्रतिभा ताई व रविना ताई यांनी बालकांना राख्या बांधल्या, तर प्रदिप पाटील , विश्वजीत सपकाळे, प्रशांत चौधरी यांनी मुलींकडून राख्या बांधून भेटवस्तू व गोड खाऊ वाटप करून समतोल प्रकल्पा तर्फे हार्दिक शुभेच्छा दिल्या.



# गाईड पथकाच्या वतीने निगडी पोलिस ठाण्यात रक्षाबंधन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गुरुवार दिनांक ३१/०८/२०२३ रोजी आकुर्डी येथील नवनगर शिक्षण मंडळाच्या सरस्वती माध्य. व उच्च माध्य. विद्यालयतील इयत्ता ५ वी ते १० वी च्या गाईड पथकाच्या वतीने रक्षाबंधनचे औचित्य साधून निगडी पोलिस ठाणे येथील बंधू भगिनींना राखी बांधण्याच्या कार्यक्रमाचे नवनगर शिक्षण मंडळाचे संस्थापक गोविंदराव दाभाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आलेले होते. या प्रसंगी निगडी पोलिस ठाणे मधील सर्व बंधू व भगिनी तसेच सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे गाईडर सौ.प्रतिमा काळे, सौ.जयश्री घावटे, सौ.देवरे मॅडम उपस्थित होते. या प्रसंगी उज्ज्वला पाटील यांना सौ. प्रतिमा काळे यांचा "मी प्रतिमा माझी प्रतिमा" हा काव्यसंग्रह सप्रेम भेट देण्यात आला व मुलींना पोलिस ठाण्यातून खाऊ वाटप करण्यात आले.



# इंडिया आघाडीच्या नावाने भाजपविरोधी संघटनांची एकजूट

## धुळ्यात आगामी निवडणुका एकदिलाने लढण्यासह पाच ठराव संमत

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** मुंबईत इंडिया आघाडीच्या नावाने गुरुवारी देशभरातील भाजपविरोधी पक्षसंघटनांची बैठक होत असताना काँग्रेसच्या वरिष्ठांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांना दिलेल्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यातही काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर यांनी आयोजित केलेल्या सर्वपक्षीय इंडिया मीट बैठकीला चांगला प्रतिसाद लाभला. गुरुवारी शहरातील काँग्रेस भवनमध्ये पार पडलेल्या या बैठकीला भाजपविरोधी पक्ष, संघटनांचे सुमारे २०० प्रतिनिधींची उपस्थिती लाभल्याने इंडिया आघाडीचे प्रतिबिंब पाहावयास मिळाले.

या बैठकीत उपस्थित प्रतिनिधींनी भाजपच्या ध्येयधोरणांवर कडाडून टीका केली. तसेच यावेळी पाच ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले. त्यात धुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा तसेच पीकविम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम तात्काळ शेतकर्यांच्या बँक खात्यात जमा करा, धुळे मनपात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची स्वतंत्र एसआयटीमार्फत चौकशी करा, धुळे जिल्ह्यातील अवैध धंदे पूर्णपणे बंद करुन जिल्हा गुन्हेगारीमुक्त करा, केंद्रीय तपास यंत्रणांचा धाक दाखवून राजकीय मंडळींचा भाजपमध्ये प्रवॆश करुन घेण्याचा निषेध, इंडिया आघाडी ठरवेल त्या उमेदवाराचा सर्वांनी एकदिलाने प्रचार करुन निवडणूका जिंकणे या विषयांचे ठराव संमत झाले.

या बैठकीला काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, माजी आ. वसंतराव सुर्यवंशी, अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, शिवसेना उबाठाचे माजी आ. प्रा. शरद पाटील, अतुल सोनवणे, महेश मिस्त्री, डॉ. सुशील महाजन, किरण जोंधळे, शुभांगी पाटील, कैलास पाटील, पंकज गोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे रणजितराजे भोसले, जितेंद्र मराठे, दीपक देवरे, विमल बेडसे, काँग्रेसचे डॉ. अनिल भामरे, डॉ. दरबारसिंग गिरासे, गुलाबराव कोतेकर, भगवान गर्दे, बाजीराव पाटील, प्रमोद सिसोदे, बापू खैरनार, गायत्री जयस्वाल, बानुबाई शिरसाठ, रिपाई गवई गटाचे प्रा. बाबा हातेकर, सपाचे अमिन पटेल, बसपाचे अनिल दामोदर, वंचितचे राज चव्हाण, कॉ. एल. आर. राव, आपचे हितेंद्र पवार, शकील अहमद, डॉ, एस. टी. पाटील, सुरेश बैसाणे यांच्यासह भाजपविरोधी पक्षसंघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राष्ट्रगीताने बैठकीचा समारोप झाला. शेवटी काँग्रेस भवनसमोर रस्त्यावर फटाक्यांची आतषबाजी करीत भाजपविरोधी एकजुटीचा जल्लोष करण्यात आला.



# ‘मेरी माटी मेरा देश’ यशस्वी करावे

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या वीरांचे स्मरण करण्यासाठी 'मेरी माटी, मेरा देश' हे अभियान सुरु करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील जनतेने या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केले. बावनकुळे यांच्या हस्ते कुलाबा येथील कार्यक्रमात या अभियानाचा राज्यव्यापी प्रारंभ करण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी भाजपा प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, अभियान संयोजक राजेश पांडे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, मकरंद नार्वेकर, हर्षदा नार्वेकर, जनक संघवी, भाजपा कुलाबा अध्यक्ष हेमंत मेहर,महिला अध्यक्ष प्रविना मोदी, युवा अध्यक्ष अमित ठाकर, जिल्हा महामंत्री हेमांशु शहा, दिलीप तांडेल आदी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील वाड्यावस्त्यांमधून 'अमृत कलश यात्रा' निघणार आहे. १५ सप्टेंबर पर्यंत हे अभियान चालणार आहे.

अमृत कलशांमध्ये मूठभर माती, धान्य गोळा करून हे कलश ३१ ऑक्टोबर ला दिल्लीला अमृतवाटिकेच्या निर्माणासाठी नेले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय युद्ध स्मारकाजवळ 'अमृत वाटिका' निर्माणाच्या कामाला सुरुवात होणार आहे. अनेक कलशांमधून आणलेल्या माती आणि धान्याचे मिश्रण वापरून या अमृतवाटिकेचे निर्माण होणार आहे. ही 'अमृत वाटिका' देशातील सर्वात मोठे प्रार्थनास्थळ ठरणार असून अनेक देशी विदेशी पर्यटक इथे भेट देतील. हे संपूर्ण देशाचे अभियान असून त्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असेही बावनकुळे यांनी नमूद केले. कुलाब्यातील कोळी बांधवांनी पारंपरिक वेशात या अभियानात सहभाग घेतला. अभियान संयोजक राजेश पांडे यांनी उपस्थितांना पंचप्रण शपथ दिली.

# बावरिया टोळीची विदर्भातील वाघांवर वक्रदृष्टी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भात वाघांची संख्या वाढत असल्याचे जगभरातून कौतुक होत आहे. देशासह विदेशातील लक्षावधी पर्यटक वाघ बघायला विदर्भात येत आहेत. परंतु, दुसरीकडे वाघांची ही वाढलेली संख्या शिकाऱ्यांनाही खुणावत असून वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेल्या हरियाणा व पंजाबातील बावरिया टोळीने विदर्भातील वाघांना लक्ष्य केले आहे. ही टोळी तब्बल १५ वाघांच्या शिकारीचे लक्ष्य घेऊन विदर्भात आली असून यातील चार वाघांची शिकार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या टोळीने आतापर्यंत चंद्रपूर जिल्ह्यातील सावली वनपरिक्षेत्रात दोन व गडचिरोली जिल्ह्यात दोन वाघांची शिकार केल्याचे उघडकीस आले आहे. दरम्यान या प्रकरणात रूमाली बावरिया (४८), राजू सिंग (३६) व सोनू सिंग (३८) या तीन जणांना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या बावरिया टोळीतील या शिकाऱ्यांकडून आठ ते दहा लोखंडी सापळे देखील जप्त करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून या दोन्ही जिल्ळ्यात त्यांनी ठाण मांडले आहे. चौकशीदरम्यान शिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती खात्याचे अधिकारी तपासत असून शिकारीत सहभागी असणाऱ्या इतरांचाही शोध घेतला जात आहे. बावरियांच्या शिकारीची पद्धत, त्यांना शिकारीसाठी मिळणारी मदत याचाही शोध घेतला जात आहे. या प्रकरणात आतापर्यंत १९ आरोपींचा समावेश दिसून आला आहे.



# राजूर अर्बनची वार्षिक सभा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथील राजुर अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीची दुसरी अधिमंडळ वार्षिक सभा उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन व उद्घाटक मोरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा निर्मलाताई दानवे, राजुर अर्बनचे ज्येष्ठ सभासद विनायकराव कढवणे, सुळे मामा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर जिल्हा परिषद सदस्य कैलास पुंगळे, रुद्रानी फाउंडेशनचे अध्यक्ष भीमाशंकरा आप्पा दारूवाले, योगिताताई दानवे, सुशीलाताई दानवे, शोभाताई मतकर, आशाताई पुंगळे, आशाताई माळी, रोहिणीताई, विनोद वीर, सुनील देवरे, मंगेश देहेडकर, श्याम बोरबळे, श्रीरंग भोईटे, कैलास गबाळे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम चंद्रकांत बोर्डे यांनी गायलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यानंतर राजूर अर्बनच्या वतीने कार्यक्रमाच्या उद्घाटक निर्मलाताई दानवे यांचा शाल, पुष्पहार व पंचधातूंची नटराजाची मूर्ती देऊन स्वागत करण्यात आले. तसेच व्यासपीठावरील इतर मान्यवरांचेही पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शहीद झालेले जवान तसेच मृत्यू पावलेले बँकेचे सभासद, विविध क्षेत्रातील गणमान्य व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविकातून राजूर अर्बनचे संस्थापक कैलासआप्पा गबाळे यांनीअहवाल वाचनातून सभासद ठेवी व कर्जवाटप याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर अनेक ठराव सभासदांच्या आवाजी मताने मंजूर करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# बुलढाण्याचे तापमान पोहोचले ३३ अंशांवर

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** पावसाने दीर्घकाळ उघडीप दिल्याने बुलढाणा शहर परिसरात उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. बुलढाण्यातील किमान तापमान ३३ डिग्रीच्या घरात गेले आहे. मागील काही दिवसांत शहर परिसराच्या तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे दिवसा व रात्रीही पावसाळा की उन्हाळा? असा प्रश्न लाखावर नागरिकांना पडत आहे. दिवसा कडक उन्ह आणि रात्री पंखा वा कुलरचा वापर अत्यावश्यक असे चित्र आहे. गुरुवारी बुलढाण्याचे कमाल तापमान ३२.२ डिग्री तर किमान २२.३ डिग्री इतके होते. बुधवारी ३१ कमाल, किमान २१.८ डिग्री, मंगळवारी कमाल ३०.६, किमान २१.५ डिग्री तापमानाची नोंद झाली. २८ ऑगस्टला कमाल ३० तर किमान २०.५ डिग्री तापमान होते.

# शिवराज पाटील चोळाखेकर यांना राज्यस्तरीय समाजरत्न नागरी पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील चोळाखा येथील तथा धर्माबाद छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवराज पाटील चोळाखेकर यांनी विविध सामाजिक कार्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषदेच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न नागरी पुरस्कार सन २०२३ चा जाहीर करण्यात आला आहे. शिवराज पाटील चोळाखेकर हे छावा तालुका अध्यक्ष झाल्यापासूनच नाही त्याअगोदर सुध्दा विविध सामाजिक कार्यात सहभाग घेत होते.त्यानंतर समाजिकबरोबर शेतकरी,मंजुर, शैक्षणिक,इतर विविध कार्यात निवेदन, उपोषण, रास्ता रोको, व विविध आंदोलन जनमानसासाठी नियमानुसार केले, एवढेच नसुन कुठे यात काम झाले नसेल तिथे जनसेवेसाठी छावा संघटनेचा दणका दाखविला. सामाजिक सह इतर श्रेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांच्या कार्याची पावती म्हणून महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषदेच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय समाजरत्न नागरी पुरस्कार सन २०२३ चा जाहिर झाला.हा पुरस्कार दि. ३ सप्टेंबर २०२३ रोजी रविवारी सकाळी ११.३० वाजता नांदेड येथील कुसुम सभागृह मध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.हा पुरस्कार देण्यात येत असल्याने त्यांचे तालुक्यातील राजकीय, धार्मिक, शैक्षणिक व पत्रकार क्षेत्रातुन कौतुक होत आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# रिसोड आगराच्या गलथान कारभारामुळे प्रवाशांची गैरसोय

आधुनिक केसरी न्यूज

**आत्माराम जाधव**

**रिसोड :** नादुरुस्त बसेसमुळे रिसोड एसटी आगाराचा गलथान कारभार अनेक वेळा चव्हाट्यावर आला असतांना, आता आगारातील पुन्हा एक प्रकार पुढे आला आहे. आगार व्यवस्थापक यांच्या दुर्लक्षामुळे वाहतूक निरीक्षकांचा मनमानी कारभार सुरू असून, आपल्या मर्जीनुसार नियोजित सुटणाऱ्या अनेक बस फेऱ्या ऐनवेळेवर रद्द करण्यात येत आहेत. परिणामी या मनमानी कारभारामुळे नियोजित वेळापत्रक कोलमडले आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. रिसोड आगाराच्या आशा गलथान कारभाराबद्दल संपूर्ण तालुक्यातून रोष व्यक्त करण्यात येत आहे. आगार व्यवस्थापक यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे रिसोड आगाराचा गलथान कारभार अनेक वेळा चव्हाट्यावर आला आहे. नुकताच लोणी बुद्रुक गावाजवळ संभाजीनगर कडे जाणाऱ्या शिवशाही एसटी बसचे समोरील एक चाक निखळून बाजूच्या शेतात जावून पडले होते. या दुर्घटनेत जवळपास ४० प्रवाशांचा जीव बालबाल वाचला असल्याचे ताजे उदाहरण समोर आहे. तर याआधी सुद्धा अशा घटना घडल्या असून, केवळ नशीब बलवत्तर म्हणून प्रवाशांचे प्राण वाचले असल्याचे सर्वश्रुत आहे. तथापि या अक्षम्य घटनाचा जराही परिणाम आगार व्यवस्थापनावर झाला नसल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. आता तर, वाहतूक निरीक्षकांच्या मनमानी कारभाराने त्यावर कळस चढवला आहे. आपल्या मनमानी मर्जीनुसार पूर्वीपासून सुरू असलेल्या बस फेऱ्या ऐन वेळेवर रद्द करून प्रवाशांच्या गैरसोयीचा असुरी आनंद आगार व्यवस्थापन घेत असल्याचा प्रत्यय प्रवाशांना येत आहे. तालुक्यातील अनेक गावखेड्यांना मुख्य



बाजारपेठेशी जोडणारी रिसोड ते मौजाबंदी बस फेरी १९८२ पासून अखंडपणे सुरू होती. सदर फेरी कुठलीही पूर्व सूचना न देता अचानक बंद करण्यात आली आहे. परिणामी जवळा, कुऱ्हा, मांडवा, मौजाबंदी आदी गावातील शालेय विद्यार्थ्यांसह, ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांची मोठ्या प्रमाणात पंचाईत होऊन बसली आहे. बस फेरी बंद झाल्यामुळे, शासनाने खास करून महिला वर्गासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या भाडे सवलत योजनेपासून लाभार्थी प्रवाशांना वंचित राहावे लागत आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणून, खाजगी प्रवासी वाहतूक करणारे वाहनधारक प्रवाशांकडून अव्वाच्यासव्वा भाडे वसूल करत आहेत. परंतु प्रशासकीय कामासाठी व बाजारहाटाच्या निमित्ताने तालुक्याच्या ठिकाणी जाणे अत्यावश्यक असल्याने प्रवाशांना हा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. रिसोड आगाराच्या या गलथान कारभाराचा सर्व स्तरातून खेद व्यक्त केला जात असून, विशेषतः महिला प्रवाशाकडून निषेध करण्यात येत आहे. या अक्षम्य गैरप्रकारची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेऊन बंद केलेल्या बस फेऱ्या पूर्ववत सुरू कराव्या अशी मागणी संबंधित गावातील परवाशाकडून करण्यात येत आहे.



# संविधानाचा विचार करणे गरजेचे : खोमणे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** संविधान निर्मात्याने हा देश लोकशाही प्रधान घडविण्यासाठी अतिशय कष्टाने भारतीय संविधानाची निर्मिती केली. भारतीय संविधानाचे पवित्र्य जपणे म्हणजे संविधानिक मूल्यांचे आचरण करणे होय. संविधानात नागरिकांच्या मुलभूत हक्क व अधिकारांचा अंतर्भाव आहे.स्वातंत्र्य,समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकता व एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवादी, लोकशाही, गणराज्य प्रस्थापित करण्याचे ध्येय संविधानाचे आहे. आपले हक्क व अधिकार मिळविण्यासाठी हेच संविधान आपल्याला संघर्ष करण्यास शिकविते. त्यामुळे आपल्या जीवनात संविधानाचा व संविधानात्मक मूल्यांचा विचार करणे खूप गरजेचे आहे, असे असेंड इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे यांनी म्हटले आहे.

विद्यार्थ्यांना संविधानाचे ज्ञान अवगत होण्याच्या दृष्टीने शाळांमध्ये संविधान जागृती करण्यासाठी संविधानाच्या संबंधित असलेले उपक्रम हाती घेण्याची गरज असून ते उपक्रम राबविण्यासाठी विशेष प्रयत्न होणे अपेक्षित आहे.हाच प्रयत्न निरा-पिंपरे, ता.पुरंदर येथील असेंड इंटरनॅशनल स्कूलला संविधान परीक्षेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून रक्षित सामाजिक संस्था अंतर्गत स्थापित संविधान गुण गौरव समितीच्या वतीने नूरखाँ पठाण लिखित "आपले संविधान...राज्यपद्धती नव्हे तर जीवनपध्दती" या पुस्तकावर आधारित संविधानाच्या संबंधित असलेल्या परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले असून ही संविधान गुण गौरव परीक्षा घेण्याबाबत परीक्षेची माहिती देण्यासाठी असेंड इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे यांच्या सहकार्याने शाळेत एक कार्यक्रम घेण्यात आला. संविधानाची रूपरेषा सांगण्यासाठी संविधान गुणगौरव समितीचे सदस्य सुशिल गायकवाड व लेखक कवी ॲड. आकाश आढाव उपस्थित होते. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा भुंजे, सुरेखा पाटोळे, रुपाली शितोळे,मंजुश्री काटकर, आशालता काकडे, पुष्पा शिंदे, नितीन दगडे, अर्पणा फरांदे, दीपिका निगडे, माधुरी ठोंबरे, सुजाता जाधव,मनीषा धायगुडे, यास्मिन सय्यद, किशोरी थोपटे आदी शिक्षकवृंद व रेखा मुल्ल्या,पुष्पा गायकवाड, रुपाली थोपटे आदी कर्मचारी यांना भारतीय संविधानाच्या उद्देशिका प्रत देण्यात आल्या.प्रांजल जाधव, आर्या साळुंखे, श्रेया धुमाळ आदी विद्यार्थीनी प्रश्नांची उत्तरे दिल्या बद्दल त्यांना ही संविधानाच्या उद्देशिका प्रत देण्यात आल्या. परीक्षा कशा पध्दतीने घेण्यात येणार आहे.याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

# सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कार्यवाही करणार : पोलिस अधीक्षक

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सण -उत्सव काळात सामाजिक सलोखा टिकुन राहिला पाहिजे यासाठी नागरिकांनी प्रयत्न करणं गरजेचं आहे. आपल्या गावात शांतता नांदली तर देशातहि तीच परिस्थिती निर्माण होईल. ऊत्सव काळात शांतता भंग करण्यासाठी काहिजण प्रयत्न करतात तेड निर्माण करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही केली जाईल, असा इशारा अप्पर पोलीस अधिक्षक खंडेराव धरणे यांनी शुक्रवारी ( ता ३१ ) दिला आहे. शहरातील पोलिस कार्यालयात आगामी काळात होणाऱ्या पोळा, गणेश उत्सव, दहीहंडी, ईद, दुर्गामहोत्सवा निमित्ताने शांतता कमेटिची बैठक आयोजित करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर उपविभागीय पोलिस अधिकारी शब्बखत आमना, पोलिस निरीक्षक नानासाहेब उबाळे, व्यापारी दिलीप सोनटक्के, भगवान दंडवे, प्राध्यापक व्यंकट माने, मुबीन मौलाना, ताहेर बेग, बि. आर. पाचाळ, ऊत्तम बाभळे, विक्रम क्षिरसागर, अहिल्याबाई जाधव, चद्रंकलाबाई गायकवाड यांची उपस्थिती होती. धरणे म्हणाले की, शहरातील सर्व जाती धर्मातील बांधव सण उत्साह काळात सहभागी होवून एकोप्याने राहतात ही बाब उल्लेखनीय आहे. काहि विघ्नसंतोषी लोकांकडून वातावरण दूषित करण्याचे प्रयत्न केले जातात त्यांच्यावर आमची करडी नजर राहणार आहे. सध्या मोबाईलवर दोन धर्मांत जातीय तणाव निर्माण करणारा मजकूर, व्हिडिओ प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. एकगाव एक गणपती ही संकल्पना राबवून प्रशासनाला सहकार्य करावे. ऊत्सव काळात भक्त व नागरीकाची गैरसोय होणार नाही यासाठी संबंधित विभागाना सुचना दिल्या आहेत. काही अडचणी आहेत त्या लवकरच मार्गी लावले जातील असे सांगितले. बैठकीस शहरातील प्रतिष्ठित नागरिक महिलाची बहूसंख्य उपस्थिती होती.




गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर